म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ........ २५५
दा. क्र. २०६५५
IRBK-0120799
IRBK-0120799

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे**

ना : खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे. तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (६) नुसार प्रतिदिनी २५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल. (किमान दंड १ रुपया घेतला जाईल.)

(कृ मा पहा)
१६०००/११-९५

ारकु
०७९९

मुन्नू उर्फ गणेश मतकरी
मक्या उर्फ मकरंद तोरसकर

या 'बिनधास' बालनटांना

IRBK-0120799

‘धि ग्रेट गोल्डन गँग’ या बालनाट्याचा पहिला प्रयोग शनिवार, दिनांक ३० एप्रिल १९८३ रोजी, सकाळी १० वाजता, गडकरी रंगायतन, ठाणे येथे सादर करण्यात आला.

## धि ग्रेट गोल्डन गँग

| | | |
|---|---|---|
| लेखक, दिग्दर्शन<br>संगीत–संकल्पना | : | रत्नाकर मतकरी |
| नेपथ्य, प्रकाशयोजना | : | जयवंत देसाई |
| ध्वनिमुद्रण | : | साई साऊंड स्टुडिओ |
| ध्वनिसंकेत | : | दादा परसनाईक |
| द्वंद्वसंयोजन | : | प्रभाकर सावंत |
| संयोजन | : | यशवंत वोवळेकर |
| रंगमंच व्यवस्था | : | राजीव पितळे, प्रदीप नाईक, रंजन वेर्णेकर संजय दिवेकर |

## भूमिका

| | | |
|---|---|---|
| विक्रम | : | मकरंद तोरसकर |
| रमण | : | औमेय काळे |
| मावशी | : | माया गुर्जर |
| सुडक्या | : | गणेश मतकरी |
| माला | : | सोनल फडके |
| भैरू/डॉक्टर | : | प्रभाकर सावंत |
| किसन | : | अरविंद औंधे |
| काळूराम | : | महेंद्र निकाळे |
| भटजी/फौजदार | : | वसंत सोमण |
| हवालदार | : | राजीव पितळे |
| सुशिलाकाकू | : | सुप्रिया मतकरी |

# प्रस्तावना

एकोणिसाव्या शतकात, अमेरिकेमध्ये, मार्क ट्वेन नावाचा, एक जगविख्यात लेखक होऊन गेला. त्यानं 'टॉम सॉयर' या मुलाच्या गंमतीदार साहसावर एक कादंबरी लिहिली. आजचं हे नाटक त्या कादंबरीवरच आधारलेलं आहे.

'टॉम सॉयर' ला शंभर वर्षं उलटून गेली. पण मुलं अजून तशीच खव्याळ, खोडकर, शिस्तीला न जुमानणारी, आणि सदैव नव्या साहसात धडपडणारी राहिली आहेत. म्हणूनच बरं का छोटेकंपनी, ही साहस जितकी शंभर वर्षांपूर्वीच्या टॉमची, तितकीच ती आजकालच्या तुम्हा मुलांचीही आहेत. हे नाटक वाचताना, पाहताना तुमच्या मनात येईल, की आपल्यालाही कधीकधी अशीच हिरोगिरी, बंडखोरी करावीशी वाटते! आणि मुलांच्या पालकांना, हे नाटक पाहताना आठवेल आपलं बालपण .. आपला द्वाडपणा.... दांडगाई...... मनातल्या चित्रविचित्र कल्पना...वेडपट साहस..... आणि कधीतरी काढावी वाटलेली...

'थि ग्रेट गोल्डन गँग'

प्रिय वाचक, विक्रेते, यांस,

माझे रौप्य महोत्सवी प्रकाशन आपल्या स्वाधीन करताना माझ्या आनंदाचे वर्णन मला तरी शब्दांत बांधणे कठीण आहे. आतापर्यंत मला जसे आपण सहकार्य केलेत तसेच यापुढेही असावे ही विनंती.

दिनपुष्प प्रकाशनाने आतापर्यंत कथा, कादंबऱ्या, राज-कीय, व्यक्तीचित्र, धार्मिक, आत्मपर लेखन, साहित्य समिक्षा, लेख, बालएकांकिका हे विषय यशस्वीपणे हाताळले आहेत. त्यामुळे रौप्य महोत्सवी आपण वेगळे काही तरी काढावे म्हणून मी बालनाटक काढावयाचे ठरविले. इतर साहित्य प्रकारांकडे आपल्या कृपाषिर्वादामुळे वळेनच. आपले आशिर्वाद, शुभेच्छा. आमच्या प्रकाशनासाठी सदैव लाभोत ही नम्र प्रार्थना. त्यामुळे आम्हालाही काही साहित्यसेवा करण्यास हुरुप येईल.

विशेष असे की आतापर्यंत आमच्या व्यापारी बंधुनी जे सहकार्य दिले त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे. यापुढेही असेच सहकार्य असावे ही विनंती.

आपली नम्र,

४-१-८४

सौ. जयश्री श्री. कुळकर्णी

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
अ. क्र. २०७९९ नों. दि. २८/७/८५
वि. ........ क्र. ..................

## अंक पहिला
## प्रवेश पहिला

[अशाच एका गावातल्या अशाच एका घराचं अंगण. हे घर आहे मावशीबाईंचं. त्यांचे दोन भाचे—एक विक्रम, आणि दुसरा रमण. दोघेही सातवी-आठवीचे विद्यार्थी.
सकाळची वेळ आहे. रमण आणि विक्रम, दोघेही अभ्यासाला बसले आहेत. अर्थात दोघांचंही लक्ष अभ्यासाकडे वेताचंच. विक्रमचे कान बाहेरची चाहूल घेताहेत, तर रमणचे डोळे विक्रम काय करतो, इकडं लागले आहेत. वरवर मात्र दोघेही अभ्यासाचे नाटक सुरेख वठवताहेत.]

रमण : (कविता मोठमोठ्यानं पाठ करीत) आनंदी आनंद गडे—
जिकडेतिकडे चोहीकडे ....

विक्रम : (भूगोल घोकत) ऑस्ट्रेलियामधून निर्यातीचे पदार्थ....लोकर, रंग, वड्याळे, कापडी व सुती वस्तू, लोणी....आहा ...
पुन्हा तीच यादी म्हणतो.)

रमण : वरती खाली मोद भरे—वायूसंगे मोद फिरे
वरती खाली मोद भरे—वायूसंगे लोणी फिरे
(विक्रम हसतो, तशी लक्षात येऊन)

लोणी नाही—वायूसंगे मोद फिरे—लोणीसंगे मोद फिरे-
नाही—

विक्रम : (त्याच्या चालीवर) कापडी व सुती वस्तू, ऊ – लोकर, रंग ! घड्याळे ए –

रमण : लोकर, रंग, घड्या – वायूसंगे घड्याळ फिरे.... च्च....(विक्रम हसतो तशी त्राग्यानं )....मावशी ऽ, हा विक्रम बघ....मला अभ्यास करू देत नाहीऽ

विक्रम : ए, कानपटीन. मी काय केलय् तुझं ?

रमण : नभात भरला, दिशात फिरला,
मोद विहरतो चोहीकडे –

विक्रम : एवढ्यातेवढ्यावरून रडे –

रमण : आनंदी आनंद गडे –

विक्रम : दगडे दगडे चोहीकडे !

रमण : मावशी, बघ ना —

विक्रम : (वेडावीत) मावशी – ब ऽ घ ना, (मावशीची चाहूल लागून) ओरॅन्टोरॅन्टमधील निर्यातीचे पदार्थ.......

मावशी : (बाहेर येऊन) विक्रम, काय केलंस तू ?

विक्रम : (गंभीरपणे) लोकरी व सुती पदार्थ – घड्याळे – रंग –

रमण : मला त्रास देतो – मुद्दाम मोठ्यानं वाचतो – आम्ही चुकावं, म्हणून....

विक्रम : (पुटपुटत) ओरॅन्टोरॅन्टमधील निर्यातीचे पदार्थ – एक कानाखाली वाजवली, की रंग, लोकर –

रमण : ऐकलंस आत्ता काय म्हणाला ?

मावशी : मी नाही ऐकलं ! तुम्ही एकत्र बसूच नका बरं अभ्यासाला. चल – रमण, तू तिकडे बस.

रमण : मी नाही – मी आधीपासून इथं बसलोय् !

मावशी : मग, विक्रम, तू .... (तिचं वाक्य पुरं होण्याच्या आत विक्रम उठून जातो.) बघ - तो कसा ऐकतो, ते !

रमण : मग ? कुंपणाच्या जवळ बसायचंच असतं त्याला ! म्हंजे सुडक्या आला, की पळायला चांगलं....

मावशी : विक्रम····! आज जायचं नाही हं कुठं! परीक्षा जवळ आलीय ना? आता दिवसभर अभ्यास करायचा!

विक्रम : मी सकाळपासून करतोच आहे अभ्यास!

रमण : (मावशीस हळूच) खोटं सांगतोय्, मावशी. सुडक्याबरोबर पोहायला गेला होता!

मावशी : (विक्रम, उसन्या प्रेमळपणानं) विक्रम - आज भारी उकडतंय् नाही?

विक्रम : हो - म्हंजे तसं थोडंसं उकडतंय्.

मावशी : मग? तुला नदीवर पोहायला जावंसं नाही वाटलं?

विक्रम : मला कसं वाटणार? तू सांगूनच ठेवलंय्स ना, नदीवर डुंबण्यात वेळ घालवायचा नाही, म्हणून!

मावशी : अस्सं! मग अंगातलं ओलं झालंय्, ते?

विक्रम : घामानं! – उकडतंय्, म्हणालीस नाऽ?

मावशी : मेल्या! सदऱ्याचं टोक कधी घामानं ओलं होतं?

विक्रम : हां – ते ना – ते – मघा हातपाय धुतले स्वच्छ! तू म्हणतेस ना, अभ्यासाला बसण्यापूर्वी हातपाय स्वच्छ धुवावेत – तेव्हा भिजला सदरा!

रमण : मग, मावशी, हातापायांना वाळू कशी लागली, ते विचार.

विक्रम : चूप, चमच्या! (हे तोंडातल्या तोंडात.)

मावशी : काय शिव्या देतोय्स? तुला चांगलं वळण लागावं, म्हणून ही तुझी मावशी रात्रंदिवस झटतेय् – आणि तू शीक शिव्या घालायला.

विक्रम : मावशी – मांजर! (ती दचकून वळते)

मावशी : बोल खोटं! म्हणा त्या सुडक्याबरोबर रात्रंदिवस भटकायचं - मग आणखी कसलं वळण लागणारेय्?

विक्रम : सुडक्या, किनई, फार चांगला आहे, मावशी!

मावशी : चांगला? अरे, त्याला ना घर, ना दार! ना शाळा ना शिक्षण!

विक्रम : काय मजा आली असती त्याच्या जागी, मी असतो, तर!

मावशी : मेल्या, त्याची बरोबरी करतोस? नदीतले मासे विकून कसंबसं पोट भरणारा भटक्या पोरगा तो! याद राख, परत त्याचं नांव घेतलंस, तर!

(एवढ्यात खुणेचं 'टोक् टोक्' ऐकू येतं आणि कुंपणामागे सुडक्या हजर.)

रमण : मावशी, सुडक्या आला –

विक्रम : रमण, मावशीनं काय सांगितलं, सुडक्याचं नाव घ्यायचं नाही!

(मावशीला दिसणार नाही, अशा बेतानं सुडक्याला 'परत जा' अशा खुणा.)

मावशी : कुठाय् सुडक्या? (सुडक्याच्या दिशेनं पाहते. सुडक्या लपतो) (रमणला) मला फसवतोस म्हातारीला? (विक्रमच्या संशयास्पद हालचाली पाहून) तू असे काय हातवारे करतोयस? (सुडक्या कुंपणावरून पाहत असलेला.)

रमण : मावशी.... तो बघ सुडक्या!

मावशी : अरे, तुम्ही दोघांनी चालवलंय् काय? थांब हो, मीच जाऊन बघते. (कुंपणाशी जाते. सुडक्या पळून जाताना दिसतो.) कुठाय् सुडक्या? तुम्हां पोरांना दिसतो, मग मला म्हातारीला कसा दिसत नाही तो? आधी, मी म्हणते, इथं यायची शामतच कशी झाली त्या दळिद्री कारट्याची?

विक्रम : मग? तू समजलीस काय सुडक्याला? भलताच धाडसी मुलगा आहे तो! कसली, म्हणजे कसलीच भीती वाटत नाही त्याला! नाहीतर ही बघा आमची भित्री भागूबाई!

रमण : मावशी, बऽघ!

विक्रम : रडूबाई!

मावशी : विक्रम – आता तू त्याला चिडव तर खरी – चांगलं जळकं लाकूड घालते बघ तुझ्या पाठीत! छळवाद मांडलाय् नुसता. नतद्रष्ट मेले –

विक्रम : मावशी – मांजर! (ती दचकते.)

मावशी : आता बसा गुपचूप अभ्यासाला. आवाज ऐकू आला, तर बघा एकेकाचा. (जाते)

(क्षणभर दोघे अभ्यासात गढून गेल्याचं नाटक करतात. दुसऱ्याच क्षणी कुठूनसं एक पोरगं येतं. अंगात सदरा, हाफ पँट.)

विक्रम : एहेहे–काय पऽण ?

पोरगं : काय म्हणालास ?

विक्रम : कुठं निघालात ?

पोरगं : आम्ही कुठं पण जाऊ. तुम्हांला काय करायचंय् ?

विक्रम : आम्हांला चटणीभात करायचाय्. तुम्ही आमच्या अंगणातून कशाला चाललाय् !

पोरगं : मग ? जाऊच मुळी ! तुम्ही कोण आम्हांला अडविणार ?

विक्रम : असं––? या विक्रमला ओळखत नाही वाटतं ?

पोरगं : हट्! मी नाही ओळखत विक्रम नि चक्रम! (या उद्धटपणा-मुळं विक्रम गार. हे पोरगं आपल्याला असं बोलू तरी कसं शकतं, याच त्याला भयंकर आश्चर्य वाटतं.)

विक्रम : ओळखत नाहीस ? नवीन आहेस वाटतं या गावात ?

पोरगं : तुला कशाला नसत्या चौकशा ? बाजूला हो माझ्या वाटेतून

विक्रम : नाही होत ! काय करणारेस ?

पोरगं : ते समजेल मग ! आधी बाजूला हो–होतोस, की नाही ?

(दोघंहीजण लढाईच्या पवित्र्यांत. पुढं काय होणार, याचा अंदाज येऊन रमण " मावशी, मावशी " असं ओरडत माव-शीला घेऊन यायला घरात पळतो.)

विक्रम : काय पण कपडे घातलेत ? एखादया पोरीसारखे !

पोरगं : नाहीतर काय तुझ्यासारखे भंकस कपडे घालायचे शंभर ठिकाणी डाग पडलेले ?

विक्रम : मारामारी करणाऱ्या शूर मुलांचे कपडे असेच मळके असतात, समजलं ? तुझ्यासारख्या रडूबाईचेच कपडे स्वच्छ राहणार !

पोरगं : कोणाला रडूबाई म्हणतोस ? मी तुला धुळीत लोळवीन, तेव्हा समजेल.

विक्रम : तोंड धुऊन ये !— मला धुळीत लोळवतंय् ? मीच असा खेचीन —

पोरगं : खेच की–उगाच बडबड कशाला करतोस ?

विक्रम : बघ हां. मग रडशील.

पोरगं : अरे, हां—बघू या बघू या–

(दोघेही अकमेकांवर तुटून पडतात. विक्रम सहजपणे नव्या पोराला लोळवतो. पण आश्चर्य म्हणजे, ते पोर रडत नाही. उलट, त्याला या सगळ्या प्रकाराची गंमत वाटत असावी. मारामारी रंगात आली असताना रमण मावशीला बाहेर घेऊन येतो.)

रमण : बघ, कसा मारतोय् त्या पोराला ? – सांगितल नव्हतं !

मावशी : चांडाळा, ऊठ-ऊठ आधी ! अरे, मरेल ते पोर ! (विक्रम तर उठतोच, पण 'ते पोर' देखील अजिबात न रडता पटकन् उठून कपडयांवरची धूळ झटकत उभं राहातं (मारामारीत त्याचे लांब केस मोकाट सुटलेले.) लागलं का कुठं ? आमचा हा पोर धटिंगण आहे नुसता. नवीन दिसतोस तू गावात–? नाव काय तुझं ?

पोरगं : माला.

विक्रम : ॲई ! पोराचं नाव माला ?

मावशी : अगोबाई—म्हंजे मुलगी का आहेस तू? आणि कपडे काय घातलेयूस मुलासारखे?

माला : आई म्हणते, तू माझा मुलगाच आहेस!

मावशी : आहेस खरी, हो! मारामाऱ्या पण मुलांसारख्याच करतेयूस!

माला : बाबा म्हणतात, आता मुलींनी प्रत्येक गोष्टीत मुलांची बरोबरी केली पाहिजे!

विक्रम : आयला!

मावशी : काय म्हणालास, विक्रम?

विक्रम : मी म्हटलं, हिच्या आयला नि बाबांना पण—मानलं पाहिजे,

(माला मोठ्यानं खिदळते.)

मावशी : इथं मागच्या गोळगुंड्यांकडे आलीयूस वाटतं? म्हणत होते. पाहुणे यायचेत, म्हणून! – थांब हो. काही तरी हातावर ठेवते. (घरात जाते. विक्रम जरा वेळ चुळबूळ करीत उभा. आपलं कुठंतरी चुकलं, हे त्याला जाणवतंय्. पण आता ते कसं निस्तरावं, हे मात्र त्याला समजत नाही त्यातून ती पोरगी खिदळत बसलेली.)

विक्रम : ए - खिदळू नको ना!

माला : काय करशील, खिदळले, तर? – मारशील मघासारखं?

विक्रम : ए – लागलं का, ग, तुला?

माला : अंहं – जाम मजा आली!

विक्रम : तू मुलगी आहेस, हे माहीत असतं ना - तर नसती मी मारामारी केली!

माला : म्हणून तर मी आधी सांगितलं नाही! नाहीतर मुलगे खेळायला सुद्धा येत नाहीत आमच्याबरोबर! इतका कंटाळा येतो—! मला आवडतं मुलांसारखं मारामारी करायला, झाडावर चढायला—पोहायला!

: खरंच ?—मग आपलं सॉलिड पटेल ! माझा ना आणखी एक मित्र आहे सुडक्या म्हणून !

(एवढ्यात लांबून मालाच्या आईची हाक—'माले—अग—मालेऽ')

माला : आले आलेऽ—आई बोलावतेय्. मी नंतर येते. (पळत जाते.)

रमण : एऽ, आज कसा एक माणूस मुलीशी बोलला ! नेहमी म्हणतो—मुलींशी बोलणं हाय हाय !

विक्रम : रम्या, गप्प बसतोस, की नाय ? आणि थांब, मघा माझ्या चहाड्या करीत होतास मावशीकडे—त्याबद्दल द्यायचाय् चांगला खाऊ !

मावशी : हं. हा खाऊ आणला. (खाऊची वाटी घेऊन मावशी बाहेर येते.) हे काय, गेली कुठं ही पोर एवढ्यातल्या एवढ्यात ?

विक्रम : तिच्या आईनं बोलावलं. येईल नंतर. खाऊंच द्यायचाय् ना ? मग ठेव की इथं. मी देईन तिला.

मावशी : तुला, चांडाळा, मी चांगली शिक्षा करणार आहे. त्या पोरीशी मारामारी केलीस, त्याबद्दल.

विक्रम : अग, पण, मावशी, तेव्हा मला वाटलं, की ती मुलगाच....

मावशी : मुलगा असू दे, नाहीतर वांदर. [तुला मारामारी करायची गरज काय होती ? बोल. ते काही नाही, आज तुला शिक्षा करणारच आहे मी. त्याशिवाय सुधारायचा नाहीस-एकसारखी दांडगाई, दांडगाई ! तो रमण बघ.

विक्रम : मामा आहे एक नंबरचा !]

मावशी : आता नीट ऐकून घे. या कुंपणाला कधीपासून रंग काढायला झालाय् !

विक्रम : हो—काढू या ना !

मावशी : तो तू काढायचास !

विक्रम : मी ?—कधी ?

मावशी : आत्तां !

विक्रम : मी ? आणि कुंपणाला रंग ? काय तरी काय ? मास्तर म्हणतात, की माझं ड्रॉइंग भलतंच वाईट आहे.

मावशी : असू दे. कुंपणाला रंग लावायला ड्रॉइंग चांगलं असायची काही गरज नाही. रमण, तो डबा आण फडताळातला.

रमण : कुठला ? लाडवांचा ?

मावशी : रंगाचा ! आणि दोन ब्रश ! (रमण तात्काळ जातो.) मी जाते पापड घालायला चाचडांकडे ! परत येईन दुपारी !

विक्रम : आणि जेवायचं कधी ?

मावशी : मी आल्यानंतर – आणि तोवर रंगवून पुरं झालं नसलं, तर जेवण नाही अन् काही नाही !

विक्रम : पण, मावशी, अभ्यास किती पडलाय् – परीक्षा किती जवळ आलीय् ....

मावशी : परीक्षा नंतर. आधी रंग !

रमण : (येतो–डबा पुढे करीत) घ्या रंग !

मावशी : रमण, घरात जाऊन बस अभ्यासाला. जरा लक्ष ठेव. मांजर-बिंजर शिरेल फडताळात ! जा...मी गेले. (जाते.)

रमण : डिंग डिंग. एका माणसाला कुंपण रंगवून होईपर्यंत जेवण मिळणार नाही.

विक्रम : शटाप् ! (पाय आपटतो. रमण पळून जातो. विक्रम नाखुशीनं डबा उघडतो. ब्रश काढतो. रंगवल्यासारखं करतो, कंटाळतो. वैतागून स्वतःशी गातो.)

—म्हणे रंग द्या ! वैताग वैताग वैताग म्हणे रंग द्या !
काय म्हणून ? तर शिक्षा, म्हणून !
शिक्षा का झाली ? मारामारी केली !
आता आम्ही करायची नाही
थोडी मस्ती, मारामारी,
धूम धांदल आणि दंगा,

तर करायची कोणी? सांगा!
का मावशीनं करायची कुस्ती?
की आजीनं, हाय हाय जंपिंग!
मास्तरांनी करायची फायटिंग?
की थेरड्यांनी करायची बॉक्सिंग?
आणि मग–आम्ही मुलांनी करायचं काय?
वाती वळायच्या, जाती दळायची,
की चालायचं काठी टेकीत टेकीत?
हट्–अशी कधी मुलं असतात काय!
मग मलाच ही शिक्षा–व्हाय्, व्हाय्, व्हाय्?
सुडक्या कसा मजेमधे
चिंचा पाडतो, डुंबत राहतो
पाखरं धरतो, पतंग उडवतो
आणि मी रंग द्यायचा
हा तर अन्याय – व्हाय्, व्हाय्, व्हाय्?
जगातल्या मुलांनो, आवाज उठवा!
मोठ्यांची जुलूमशाही चालायची नाही.
अन्यायाची शिक्षा भोगायची नाही.
बंड–बंड–बंड चला करू
शत्रूला जिंकू, अथवा मरू!
टोळी करा – स्वतंत्र व्हा.
अेक गँगच काढा – थि ग्रेट गोल्डन गँग!
बंद बंद अभ्यास–बंद, शाळा बंद!
आंघोळ बंद – टापटीप बंद!
बहिष्कार, बहिष्कार!
गोल्डन गँगचा जयजयकार.
पण–जगातले अन्याय संपेपर्यंत
गोल्डन गँगच्या सरशीपर्यंत

कुंपण रंगवून होईपर्यंत
जेवण मिळणार नाही – जेवण मिळणार नाही.
तेव्हा आता तरी, विक्रमसिंग–
रंग द्या– वैताग ! रंग द्या – वैताग, रंग द्याऽऽ
(भैरू गडी येतो.)
काय, भैरवनाथ, बरं आहे ना ?

भैरू : हां, बराय् ! चार कळशा भराया चाललू दाभाडयांच्या हितल्या.

विक्रम : भैरू, एकसारखं पाणी भरून तुला कंटाळा नाही का रे येत ?

भैरू : येतो, तर ! – काय झालं – पण कंटाळा करून कसं भागायचं ? काम केल्याशिवाय पैसे थोडेच मिळणार !

विक्रम : हे बघ – आपण कामाची अदलाबदली करू या का ? म्हणजे मी तुझ्या वाटचं पाणी भरतो, आणि तू माझ्या वाटचं हे कुंपण रंगव -- चालेल ?

भैरू : नाय, बा ! आपल्या बाच्यानं ते काम जमायचं नाही. त्यापरीस पानी भरनंच बेस. (जातो.)

विक्रम : घ्या, विक्रमराव. भैरू सुध्दा तुमचं काम घ्यायला तयार नाही ! आता काय करावं ?

(माला परत येते.)

माला : अय्या, हे काय ? तुझ्या मावशीबाईंनी तुला शिक्षा दिलेली दिसतेय् --

विक्रम : (कामात गर्क असल्याचं दाखवून) माला, तिथं मावशीनं तुझ्यासाठी खाऊ ठेवलाय्, तो खा अन् फूट बरं इथनं. उगाच मला डिस्टर्ब करू नकोस.

माला : (वाटीत पाहून) अय्या -- राजगिऱ्याचा लाडू ! तुला पण ठेवलाय् !

विक्रम : (गंभीरपणे) माझा राहू दे. आधी हे पुरं करतो, नि नंतर खातो. लाडवात एवढं काय विशेष आहे? खरी मजा या रंगवण्यातच आहे!

माला : कमाल आहे! इतकं आवडतंय् तुला ते काम?

विक्रम : काम? कुठलं काम म्हणतेयस् तू?

माला : हेच! कुंपण रंगवणं हे काम नाही वाटतं?

विक्रम : (मोठमोठ्यांनं हसून) मला वाटलंच! कुठलीही पोरगी याला कामच समजणार! पण मुलांना इतकी मजा वाटते, असे उभे-आडवे ब्रश फिरवायला!

माला : तुला काय वाटतं? —मला हे जमणार नाही?

विक्रम : ॲऽ? अशी आयडिया आहे काय! मी म्हणीन, दाखव बघू! आणि ब्रश देईन—असं वाटलं तुला—होय ना? पण मी नाहीच देणार.

माला : नाही देणार, तर नको देऊस जा! आम्ही जातो भंडाऱ्याच्या मळ्यात चिंचा पाडायला!

विक्रम : चिंचा? -पण नकोच! जा, जा - तूच जा!

माला : (परत येऊन) एवढी काय मजा येते, रे, कुंपण रंगवण्यात?

विक्रम : ते रंगवणाऱ्यालाच कळणार! दुसऱ्याला कसं कळेल?

माला : ए .... मला बघू दे ना जरा रंगवून.

विक्रम : नाही जमायचं. मावशीनं सांगितलंय्, तूच रंगव, दुसरी मुलं वाट लावून ठेवतील. फार फार जोखमीचं काम आहे.

माला : मी अगदी सांभाळून रंगवीन. मग तर झालं!

विक्रम : बघ हं! बिघडवलंस, तर?

माला : (खिशातून पेरू काढून देत) हा पेरू घे तुला. आता तरी देशील की नाही, रंगवायला?

विक्रम : मैत्री म्हणून देतो. (ती रंगवू लागते. तो मजेत पेरू खाऊ लागतो. रमण येऊन पाहत राहतो.) येते ना मजा?

माला : तर—! एकसारखं रंगवतच बसावंसं वाटतं!

रमण : ए— मला दे ना, रे, रंगवायला.

विक्रम : अरे, वा, रे, वा - तिनं मला पेरू दिला, म्हणून रंगवायला दिलं मी तिला.

रमण : ए— असं काय करतोस? मी भाऊ ना तुझा? हवं तर मी तुला - (खिशातून रंगीत गोट्या काढून) या देईन.

विक्रम : बघ, बाबा - ती देत असली रंगवायला, तर —

माला : पण अगदी सांभाळून रंगव हं —

(दोघं रंगवू लागतात. एवढ्यात भैरू येतो.)

विक्रम : काय, भैरू, -- झालं का पाणी भरून ?

भैरू : झालं भरून! आँ.... आणि तू मजेत बसलायस? त्या कुंपणाच्या कामाचं —

विक्रम : नाव काढू नकोस. आधीच त्या दोघांना मी रंगवायला दिलंय्, त्याबद्दल मावशीचा मार खावा लागणार आहे! त्यातनं तू आणखी नको रंगवायला मागू --

भैरू : मी कुठ मागतोय् रंगवायला ?

विक्रम : ज्यानं त्यानं आपापलंच काम करावं, हे बरं. तुझ्यासारख्यानं पाणी भरणं ठीक! रंगकामातली मजा तुझ्यासारख्या रासवट माणसाला कशी कळणार ?

भैरू : नाही -- पण म्हटलं, बघू याच एकदा!

विक्रम : नको, रे, बाबा -- मघा म्हटलं, तेव्हा गंमत केली तुझी! उगाच वेडंवाकडं रंगवून ठेवलंस, तर —?

भैरू : (पिशवीतून दोन संत्री काढून देत) विक्रमदादा, ही ठेवा तुम्हांला. पन मला एकदा रंगवायचा चानस दयाच.

विक्रम : बरं. कशानं रंगवशील? (एका काटकीला रुमाल बांधतो.) यानं रंगव. (तोही रंगवू लागतो. किसन येतो.)

किसन : विक्रमशेठ, तुमच्यासाठी, बघा, मी काय आणलं? (त्याला एक बाजा देतो.)

विक्रम : बाजा ! काय मस्त आहे ! कधीपासून मला असला बाजा हवा होता ! जाम मजा येईल बाजा वाजवायला ! (वाजवून बघतो.)

किसन : मला वाटलंच, तुम्हांला आवडेल, म्हणून !

विक्रम : किती पैसे द्यायचे या बाजाचे ?

किसन : मस्करी करता होय गरिबाची ? बाज्याचें कसले पैसे ? दोस्ती-मध्ये दिला ! तुम्हांला आवडला ना, मग मला सगळं मिळालं !

विक्रम : किसन – तुझ्याइतका चांगला माणूस सबंध गावात दुसरा नसेल ! पण लोक म्हणतात, की किसन दारूड्या आहे ! दारूपायी वाया गेला !

किसन : लोकांचं खरं आहे, विक्रमशेठ – पण काय करू ? – व्यसन लागलं – आता सुटत नाही !

विक्रम : अरे, पण नुकसान किती होतं त्यामुळं ! लोक आपले तुला दारू पाजतात, आणि त्या बदल्यात तुझ्याकडून पुष्कळ कामं करून घेतात !

किसन : तर हो !

विक्रम : हा वाईट नाद खरंच सोड, किसन—नाहीतर एखाद दिवशी संकटात येशील !

किसन : किती तळमळून बोलता, विक्रमशेट !

विक्रम : उपयोग काय ? तुला ते पटेल तर ना ? बरं हे घे संत्र ! काही खाल्लं नसशीलच सकाळपासून !

किसन : द्या, नंतर खातो.

विक्रम : म्हंजे कुठल्या तरी लहान मुलाला देऊन टाकणार नेहमीसारखं ! होय ना ? ते काही नाही–आता खा. माझ्यासमोर.

किसन : बरं, बुवा–आत्ता खातो. देव तुमचं भलं करील, विक्रमशेट. (खातखात जातो.)

विक्रम : (रंगवणाऱ्या मंडळींकडे जाऊन) काय, माला, मजा येते ना कुंपण रंगवायला ?

माला : तर !

(एव्हाना रंगकाम जवळजवळ पूर्ण झालेलं. एवढ्यात मावशीची चाहूल लागते.)

मावशी : (लांबून) विक्रऽम ! – तो कसला जागेवर राहतो, म्हणा ! गेला असणार पळून - माझी पाठ वळल्याबरोबर !

विक्रम : अरे, बाप रे ! – मावशी येते यू ! पळा – पळा सगळे ! नाहीतर माझी पाठ सडकून निघेल तुम्हांला रंगवायला दिल्याबद्दल !

(चौघे चार दिशांना पळतात. मावशी येते.)

मावशी : येऊ दे कार्ट्याला घरी. नाही काढली त्याची पाठ सडकून, तर —

विक्रम : (दबकत दबकत येऊन) मावशी, कोणाची पाठ काढणारेयस् सडकून ?

मावशी : तुझी, – माकडा, तुझी ! कुठं गेला होतास पळून ?

विक्रम : गेलो होतो कुठं ? इथंच तर होतो की, पण तुझी शप्पथ, कुंपणाला काही मी हात लावला नाही !

मावशी : नाही ना ? मला वाटलंच होतं — बघ आता वाढते का तुला जेवायला — अगदी उपासानं मेलास, तरी —

विक्रम : पण, मावशी, तू अशी मधेच कशी परत आलीस ?

मावशी : मग ! आहे, की नाही, मी हुशार ? मला बरोबर संशय आला ! म्हणून तर मधेच बघायला आले !

विक्रम : मग आल्यासारखी बघच कुंपण ! फर्स्टक्लास रंगवलंय्, की नाही, सांग !

मावशी : मेल्या, माझी म्हातारीची मस्करी करतोस ?

विक्रम : मस्करी नाही ! तू बघ हवं तर !

मावशी : (जवळ जाऊन पाहत) अगो बाई, म्हंजे, तू खरंच रंगवलंस का काय? बाकी कमाल आहे, हो, तुझी! म्हटलं थोडंसं रंगवलं असलंस, तरी, शिक्षा माफ करायची – म्हणून आले सांगा-यला, तर जळ्लं तुझं लक्षण ते, सबंध रंगवून ठेवलंस! आणि माझी शपथ खोटीच घेतलीस ना, कुंपणाला हात लावला नाही, म्हणून?

विक्रम : तुझी शप्पथ मी खोटी कशी घेईन, मावशी? कुंपणाला हात लावला नाही, म्हंजे ब्रशनं रंगवलं!

मावशी : कर डांबिसपणा! पण डांबिस असलं, तरी – (रमण हळूच बाहेर येऊन अंदाज घेतो.) मोठ्ठं गुणाचं आहे, हो, माझं बाळ! बघ – मनात आणलंस, तर किती काम करता येतं तुला! पण, मेल्या, मनात आणशील, तर ना? आज कसं पाच मिनिटांत एवढं मोठ्ठं काम एकट्यानं —

रमण : मावशी, त्यानं एकट्यानं कुठं —

मावशी : नाहीतर काय करील? शिक्षाच दिली होती ना एकट्यानं रंगवायची! दुसऱ्या कुणी त्याच्या वाटचं काम केलं असतं, तर फोडून नसतं काढलं मी त्या माणसाला?

विक्रम : (रमणला) समजलं? फोडून काढलं असतं.

मावशी : आता चला, हो, जेवायला. मी पानं घेते न् बोलावते. तुम्हांला वाढून मग परत जाते चाचडांकडे पापड लाटायला आपलं चाचडांचे पापड लाटायला.

(घरात जाते. तोच खुणेचा आवाज येतो. 'टोक्, टोक्')

विक्रम : (आनंदानं) सुडक्या आला! सुडक्या–सुडक्या कुंपणावरून उडी टाकून येतो. त्याच्या अंगात कोणीतरी दिलेले, मळके, फाटके तुटके कपडे.)

विक्रम : मघाशी आला होतास ना?

सुडक्या : हां, पन तुजी मावशीबाई बसली होती ना पहारा लावून? म्हून फुटलो! आपल्याला लई भीती वाटते, बाबा, तिची!

विक्रम : तिला कशाला घाबरायचं ? रागावते जाम--कधीकधी अगदी कानसुद्धा पिरगाळते ! पण माझ्यावर तर तिची फारच माया आहे !

रमण : माझ्यावरसुद्धा. पण, सुडक्या....तू मात्र तिला बिलकुल आवडत नाहीस. तुझा हा अवतार, धर्मशाळेत राहणं, शाळेत न जाणं, आंघोळ न करणं, नदीत डुंबणं....या असल्या गोष्टींची अगदी शिसारी आहे तिला!

सुडक्या : (खूप दुखावलेला,) बरं आजपासनं न्हाई येनार मी तुमच्या हितं ! मला घर, ना दार....आई, ना बाप! ..तुमी बडी मानसं. मी कसं यावं तुमच्या घरला ?

रमण : नकोच येऊस !

विक्रम : रम्या....तू चालता होतोस, की दात पाडून ठेवू ? (रमण पळतो.) तू लक्ष देऊ नकोस, सुडक्या, त्या हरामखोराकडे ! खरं सांगू ? तू आहेस, तसाच मला आवडतोस ! उलट, तुला शाळेत जावं लागत नाही ..साबण लावून आंघोळ करावी लागत नाही -- सारखे-सारखे कपडे बदलावे लागत नाहीत. उघड्या आभाळाखाली राहायला मिळतं ! असं मला मिळालं असतं, तर काय मज्जा आली असती ! खरंच, सुडक्या, मी पण होऊ का, रे, तुझ्यासारखा ?

सुडक्या : हां हां... जरूर हो माझ्यासारका, मग माझ्याबरोबर येशील आज ?

विक्रम : येईन ना. कुठं ?

सुडक्या : मसणात.

विक्रम : असं, रे, काय ?

सुडक्या : खरंच मसणात जायचं आपण.

विक्रम : कशाला ?

सुडक्या : मेलेल्या मांजराला पुरायला.

विक्रम : मेलेलं मांजर ? त्याला मसणवटीत कशाला पुरायचं ? त्यापेक्षा नदीत फेकून दिलं, तर-----?

सुडक्या : नाय चालणार. जंगलातल्या मांत्रिकानं मला सांगितलंय्, का काळं मांजर नेऊन मसणवटीत पुरायचं, म्हंजी भुतंखेतं ते घेत्यात न् आपल्याला वश हुत्यात !

विक्रम : भुतंखेतं वश होतात ! अरे, बाप, रे ! पण तुला कशाला हवीत भुतंखेतं ?

सुडक्या : अरं, एकदा ती माझ्या ताब्यात आली, की मला त्येंच्यापासून कंदी बी तरास नाय व्हनार. मंग गावाभाईर त्यो भुताटकीचा वाडा हाय ना, तिथं मला आरामात -्हाता यील ! नायतर दुसरं कुठलं घर मिळणार हाय मला ?

विक्रम : खरंच ! मग ठरलं ! भुतांना वश करून घ्यायला स्मशानात मांजर पुरून यायचं. पण कधी ?

सुडक्या : आज रातीच. आज त्या लगडे सोनाराचं पोर म्येलं ना, ते पुरलंय् मसनवटीत. ते न्याया भुतं नक्की येतील. (रमण येतो. पण दोघे काही खाजगी बोलताहेत, असं पाहून लपून ऐकू लागतो.) तवा आपन त्यांना मेलेलं मांजर दिऊ.

विक्रम : मग ठरलं, तर ! आज रात्री आपण स्मशानात जायचं.

सुडक्या : तुला भ्या बी नाय ना वाटनार ?

विक्रम : हॅट ! आपण नाही घाबरत भुताबितांना. आपण गब्बरखान है ! गावका बच्चा बच्चा हमको जानता है। हम किसीको डरते नहीं। भूतको नहीं और भूतके बापको भी। भूत दिसलं, तर आपण त्याच्याशी असा शेकहॅन्ड करायचा--

सुडक्या : काय करायचं ? शेकहंडी ?

विक्रम : शेकहंडी नाही ! -- शेकहॅन्ड ! (त्याचा हात धरून) आणि म्हणायचं : हॅलो, मिस्टर घोस्ट !

सुडक्या : (हात हलवीत) हलाव, हलाव--शाब्बास ! लई डाराडूर निजू नगंस-हां. आन् आता फुटतो मी. नाय तर तुजी ती मावशीबाई....

मावशी : (आतून) अरे ऽ येताय् ना, रे, जेवायला ?

विक्रम : आलो, आलोऽ (सुडक्या पळतो. विक्रम वळतो, तो त्याला रमण दिसतो.) साल्या, चोरून ऐकत होतास आमचं बोलणं ?

रमण : नाही काहीऽ ! मी तुला जेवायला बोलवायला...

विक्रम : हे बघ, मी स्मशानात गेलो, असं मावशीकडे बोललास ना-- तर एका रमणचे दहा रमण करून ठेवीन. समजलं ? टेन रमणाज ! किती !

रमण : हो - हो - ओरडतोस केवढ्यानं ? मी नाही बोलणार -- मग तर झालं ? मी कधीच चहाड्या करीत नाही. करतो ?

विक्रम : नाही--नाही. तू आणि चहाडया ? कध्धीच नाही. पण तसं कशाला ? या वेळी मी तुझा बंदोबस्तच करून टाकतो. थांब...मांजर पुरलं नि भुतं वश झाली, की त्यांतल्या एका भुताला, सांगून ठेवतो.

रमण : (घाबरून) काय सांगतोस ?

विक्रम : की रमणनं मावशीला आम्ही स्मशानात गेल्याचं सांगितलं, तर त्याच्या मानगुटीवर बसायचं.-- एकदम गच्चम् ! ठीक आहे ? आता सांग तू -- काही हरकत नाही. मी म्हणतो, तूं सांगच.

रमण : (ओरडत) नको--नको--मी नाही सांगणार. बाप, रे--भू ऽत ! (आत पळत जातो.)

विक्रम : आता कशी घाबरली भागूबाई !

मावशी : (आतूनच) अरे, विक्रम, किती वेळ, रे ?

विक्रम : आलोच. (काल्पनिक भुताबरोबर शेकहॅण्ड करीत) हॅलो, मिस्टर घोस्ट. हलो -- हलो --

मावशी : (आतूनच) विक्रम !

विक्रम : आलो -- आलो --

[ बाज्या वाजवीत आत जातो. ]

## प्रवेश दुसरा

[गावाबाहेरील स्मशान.
रात्रीचे साडे दहा वाजून गेलेले. सुडक्या आणि विक्रम दबकत दबकत आत येतात. सुडक्याच्या हातात अेक लहानसं पुडकं. बहुधा मेलेल्या मांजराचं]

विक्रम : सुडक्याऽ....

सुडक्या : हुं....

विक्रम : हुं काय ? काय तरी बोल ना.

सुडक्या : काय बोलू ?

विक्रम : काहीही बोल....म्हंजे तेवढी जाग राहते. नाहीतर सगळं शांत शांत. बाप, रे....बोल ना काही तरी !

सुडक्या : माज्या हातात हे मेलेलं मांजर हाय ना, त्ये जित्तं झालं तर ?

विक्रम : बाप, रे ! असं काही तरी भयंकर बोलू नकोस. त्यापेक्षा मी गाणं म्हणतो, म्हंजे बरं वाटेल. (गातो.) मेरे अंगनेमें तुम्हारा क्या काम है ? ....मेरे अंगनेमे तुम्हारा क्या काम है?

सुडक्या : गानं कशापायी म्हणतो ? भ्या वाटलं ?

विक्रम : नाय नाय, बुवा !

सुडक्या : मग दात कशापायी वाजतायत ?

विक्रम : थंडीनं. मेरे अंगनेमें--मेरे अंगनेमें... (चालीत) मला नाही भ्या वाटत.

सुडक्या : (दबल्या आवाजात) असं नायं....थोडं भ्या वाटतं, म्हनावं. नाय तर त्येंना वाटतं, आपुन रूबाबी करतो. मग बरूबर शिकवत्यात.

विक्रम : त्यांना कोणाला ? -हां....नाव घ्यायचं नाही. आलं लक्षात. (अेवढयात पावलांचा आवाज) पावलं ऐकलीस ?

सुडक्या : हां. कोन तरी धावत येतंय्. पन माग बघायचं न्हाई बघितलं, का धरतंयू ! काय झालं, तरी जाम माग बघायचं न्हाई. हाक बी मारंल--आपुन वळून पाह्यलं, का रगात ओकून परान ग्येलाच म्हून समजा !

[एवढयात मागून हाका ऐकू येतात. 'विऽक्रम -- सुऽडक्या']

सुडक्या : मागं बगू नगं. मागं बगू नगं.

विक्रम : (थरथरत) मेरे अंगनेमें तुम्हारा क्या --

['पुन्हा हाका-विक्रऽम, सुड ऽ क्या']

सुडक्या : आपलं नाव घेत्यात. म्हंजी त्येंनी आपल्याला वळिखलं.

विक्रम : आता, रे ?

सुडक्या : घाबरायचं न्हाई. समोर आलं, तरी म्हनायचं .... म्या तुज्यासाठी बळी हाडला हाये.

विक्रम : म्हंजे मेलेलं मांजर –

सुडक्या : हां - त्येच त्ये - त्यो बळी घिऊन परसन्न हो....काय म्हनशील ?

विक्रम : पण खरंच समोर येईल ते ?

सुडक्या : का ? घाबरला ? शेकहंडी करनार व्हतास ना ?

विक्रम : मी कसली शेकहंडी करतो ? माझीच दहीहंडी झालीय् ! म्हंजे तसा मी....तसा घाबरलो नाहीये. पण आपण कधी पाह्यलेलं नाही ना....म्हणून !

[इतक्यात पांढरी चादर पांघरलेलं कुणी तरी येऊन विक्रमच्या पाठीत फाट्दिशी एक फटका मारतं. तो उडतो. सुडक्या - देखील. दोघे थोडा वेळ पळापळ करतात. मग एकमेकांना थांबवतात.]

सुडक्या : पळून कसं चालेल ? हीच तर वेळ हाये. त्येला परसाद द्याया होवा –

विक्रम : बाप रे ! सुडक्यां, तू कुठं आहेस ? मी डोळे गच्च मिटून घेतलेत.

सुडक्या : मी बी मिटून घेतलेत ! आता काही दिसायचं न्हाई. घाबरू नगं. आता परसाद फुडं करायचा.

[दोघंही हात पुढं करतात. एकमेकांना हात लागल्याबरोबर घाबरून पळतात. डोळे उघडतात.]

विक्रम : अरे .. आपण दोघं एकमेकांनाच घाबरलो ! भूत नाही न काही नाही ! दे टाळी !

[दोघंही टाळी वाजवायला हात पुढं करतात. तर 'पांढरी चादर' त्यांच्यामध्ये उभी राहून दोघांनाही टाळी देते.]

विक्रम : आं....टाळी कुणी दिली ? त्यानं तर नाही ?

सुडक्या : परत दे बघू या....

[दोघं परत टाळ्या देऊ लागतात. यावेळी 'पांढरी चादर त्यांचे हात वरच्या वर धरून ठेवते.]

विक्रम : मेलो....मेलो....

सुडक्या : म्हण -- आमी -- ह्यो बळी.... आनला हाय् त्यो घे....

विक्रम : (दातखीळ बसली असताना) आमचा बळी घे....

सुडक्या : असलं भलतंच काय म्हन्तोस ? म्हन–आमी ह्यो बळी-- (मांजराचं पुडकं पुढं करीत) ह्यो बळी आनला हाये, त्यो ध्यावा....

विक्रम : आमचं मेलेलं मांजर घ्या....ते तुम्हांला नक्की आवडेल... तुम्ही त्याचा पुलाव करा....नाही तर करी करा...पण आम्हांला एकदाचं परत जाऊ द्या ! आम्ही सबंध जन्मात....अगदी मेलो, तरी पुन्हा इथं येणार नाही ! एकदम मेल्यावरच येऊ ! )

सुडक्या : मंग ? घेताय् ना मांजर ?

माला : शी : घाणेरडा ! मला मेलेलं मांजर देतोस ?

विक्रम : माला....? तू इथं ? आणि चादर कशाला पांघरलीयस भुतासारखी ? (आठवण होऊन) – त्यांच्यासारखी ?

माला : मग ? थंडी किती पडलीये ?

विक्रम : मग, पण त्यामुळं आम्ही किती....नाही म्हणजे....तसे घाबरलो नाही. पण आम्ही आपली तुझी गंमत केली ! हो की नाही, रे ? नाहीतर मुलीला कोण घाबरतो ?

माला : ॲह--तरी बरं, दातखीळ बसली होती मघाशी! म्हणे, मेलो, तरी पुन्हा सबंध जन्मात....

विक्रम : पण तू कशी इथं आलीस ?

माला : कशी म्हंजे ? चालत ! मला झोप येत नव्हती, म्हणून मी माडीच्या खिडकीतनं बाहेरचं चांदणं बघत बसले होते... तर तुम्ही दोघं वाटेनं जाताना दिसलात मला. मी म्हटलं, नक्की काही तरी गंमत असणार. तशीच निघाले कोणाला न सांगता....तुम्हांला किती हाका मारल्या... काय, रे ? तुम्ही वळून का नाही बघितलं ? ऑं ?

विक्रम : आम्हांला वाटलं....आम्हांला वाटलं...

सुडक्या : हां... आता लई येळ घालवून उपेग न्हाई... मांजार पुरावं आन्...

[एकदम एक किंकाळी फोडल्यासारखा आवाज येतो. तिघेही दचकतात.]

माला : आई, ग !

सुडक्या : घाबरू नगा. घुबड वराडतंया.

[घुबडाचं 'घूं घूं' मोठ्यानं.]

माला : काय भयंकर आहे ही जागा !

विक्रम : हो ना ! या स्मशानापेक्षा शाळासुद्धा बरी !

माला : अग, आई, ग! हे स्मशान आहे? मग मी जाते....मला भीती वाटते....

विक्रम : थांब....एकटी कुठं जातेस?

माला : मग तुम्ही पण चला...चला लौकर, एखादं भूत तुमच्या मागं लागायच्या आत. (इतक्यात 'फडफड, फडफड' असा आवाज.) अगबाई, हे काय आलं?

सुडक्या : वटवाघूळ उडत ग्येलं. घाबरू नगा.

माला : आं ऽ-- मला आणखीनच भीती वाटते. मी नाही थांबणार क्षणभर सुद्धा.

विक्रम : मग यायला कोणी सांगितलं होतं? मुलांची बरोबरी करायचीय् ना? -- मग थांब आता.

माला : मी नाही थांबणार. आत्ताच्या आत्ता मी घरी जाणार, म्हंजे जाणार!

सुडक्या : एकली नगं जाऊ ....

माला : मी चालले....(जाते.)

विक्रम : आता काय करायचं, रे ?

सुडक्या : जाऊ दे. आधी मांजर पुरू या न् मग लगी जाऊ या तिच्या सोबतीला.

[दोघंही जमीन उकरू लागतात. एवढ्यात माला परत येते.]

विक्रम : काय झालं? परत कशाला आलीस?

माला : मला भीती वाटते....कोणी तरी येतंय्. बाप, रे .. त्यांनी मला पाहिलं असतं....म्हणून मी परत आले—तिकडे बघा-

[दिवटीचा प्रकाश जवळ येऊ लागतो.]

विक्रम : ॲई? भुतंच इकडे येताहेत. ही मात्र नक्की भुतं. आता काय करायचं, रे, सुडक्या? राम . राम....राम....

सुडक्या : तुमी त्या झुडपाआड दडून बसा. मी या हितं....

[विक्रम व माला झुडपाआड लपतात. सुडक्या दगडाआड लपतो. हातात कंदील, फावडी, कुदळ वगैरे सामान घेऊन तिघेजण येतात. डॉक्टर, काळूराम आणि किसन. किसन दारूच्या नशेत.]

डॉक्टर : ही इथं ओली माती दिसतेय्. त्या अर्थी नक्की इथंच पुरलं असणार त्यांनी लंगड्या सुताराच्या मुलाला. इथंच खणू या हां. काळूराम, किसन, सुरू करा काम.

काळूराम : थांब, किसन, डॉक्टर, अजून आपला हिशेब बरोबर झालेला नाही. तो झाल्याशिवाय आपण कामाला हात लावणार नाही....सांगून ठेवतो.

डॉक्टर : हिशेब? आता आणखी कसला हिशेब? सगळ्या कामाचे पैसे तर तुम्हांला आधीच दिलेत.

किसन : हां, काळूराम. डॉक्टरांना प्रयोगासाठी चिरफाड करायला एका लहान मुलाच्या मुड्याची जरूर होती. म्हणून तर आपण आलो मुडदा उकरायला. मला वाटलं आधीच दिलीय्.

काळूराम : तू चूप बैस! तुला दारू जास्त झालीय्. बेवडा कुठचा?

किसन : मी काय म्हणून चूप? मी काय खोटं बोलतोय्? डाक्टर--साहेबांनी पैसे दिले. तरी तू म्हणतोस, हिशेब नाय झाला?

डॉक्टर : हवं तर हे दहा रुपये जास्त घे. पण लवकर काम आटप.

काळूराम : डॉक्टर....मी इथं आलो, तो त्या पोराचा मुडदा उकरायला नाही...तुमचा मुडदा गाडायला...

डॉक्टर : म्हंजे? तुला म्हणायचंय् तरी काय?

काळूराम : मला तुम्ही ओळखलेलं दिसत नाही, डॉक्टर. मी काळूराम डाकू. एकदा माणसावर खुन्नस ठेवला. की त्याला जिता सोडत नाही.

डॉक्टर : पण मी तुझं काय केलं?

काळूराम : तू नाही ...तुझ्या बापानं चोरीच्या आरोपावरून मला तुरूंगात पाठवलं. पाच वर्षं मी तिथं काढली. माझी बायका-पोरं मला सोडून गेली. माझा सत्यनाश झाला. आता मी त्याचा सूड घेणार....सूड....घेणार !

[त्यांच्या अंगावर धावून जातो. दोघांची झटापट होते. किसन मध्ये पडतो. डॉक्टर कुदळ उचलतात आणि तिचा दांडा काळूरामच्या डोक्यात घालतात. तो त्यांच्याऐवजी किसनला लागतो. किसन बेशुद्ध पडतो. त्याच क्षणी काळूराम कमरेचा सुरा काढून डॉक्टरांच्या छातीत खुपसतो. डॉक्टर खाली कोसळतात.]

काळूराम : खलास झाला ! डॉक्टर खलास झाला ! काळूरामनं सूड घेतला ! काळूरामाचा आत्मा थंड झाला ! आता या बेवड्या किसनवर परस्पर आळ आला, की झालं काम खतम् !

[सुऱ्याच्या मुठीवरील आपले ठसे पुसून टाकून तो किसन-च्या हातात देतो. किसन हळूहळू शुद्धीवर येतो.] किसन शुध्दीवर आलास का ? किसन, बाबा काय केलंस हे तू ?

किसन : काय झालं ?

काळूराम : (नाटकीपणे) काय व्हायचं बाकी राहिलंय् ? या दारूच्या नशेत तू खून की, रे, केलास डॉक्टरसाहेबांचा !

किसन : मी ? मी कसा खून करीन त्यांचा ? डॉक्टरसाहेब मला देवा-सारखे... वेळी अवेळी मला चार पैसे द्यायचे ! नाही, नाही मी डॉक्टरांचा खून केला नाही ! उलट, तूच त्यांच्या अंगा-वर धावून गेलास.

काळूराम : मी नुसता त्यांना दम देत होतो...पण तू सुऱ्यानं त्यांना सरळ....

किसन : सुरा ? माझ्याकडे कुठला सुरा ?

काळूराम : असं म्हणून आता काय उपयोग आहे, किसन? अजूनसुद्धा तो सुरा तुझ्या मुठीत आहे! (किसन दचकतो.) तुझ्या मनात नसेल डॉक्टरांना मारायचं! पण दारूच्या नशेत ते तुझ्या हातून घडलं, एवढं खरं!

किसन : खरंच सांगतोयस? मग तसंच असेल. मला आता काहीच आठवत नाही! दारूची नशा वाईट, असं सगळे म्हणतात, ते खोटं नाही! पण, काळूराम; मी आता काय करू, रे? माझ्या हातून खून झाला! आता पोलिस मला पकडतील.

काळूराम : पोलिसांना कसं कळणार? तू आता इथं राहूच नकोस, म्हणजे झालं.

किसन : पण तू...तू नाही ना सांगणार कोणाला?

काळूराम : वेडा! अरे, मी मित्राचा असा विश्वासघात करीन का?

किसन : काळूराम...तू देवमाणूस आहेस! मी तुझे उपकार जन्मात विसरणार नाही.

काळूराम : आता इथं राहणं धोक्याचं आहे. चल, आपण इथनं आधी बाहेर पडू आणि वेगवेगळ्या रस्त्यानं घरी जाऊ.

किसन : परमेश्वरा! काय प्रसंग आणलास हा माझ्यावर!

[दोघेही जातात. मुलं लपलेल्या जागेवरून बाहेर येतात. क्षणभर एकमेकांकडे पाहत राहतात. काय बोलावं, हे त्यांना सुचत नाही.]

माला : काय भयंकर माणूस आहे तो काळूराम! स्वतः असलं अघोरी काम करून खुशाल मित्रावर घालून मोकळा!

विक्रम : बिच्चारा किसन! इतका चांगला माणूस; पण दारूपायी संकटात आला. आता खुनाच्या आरोपावरून तो फाशी गेला, मग? आपण त्याला वाचवायला हवं.

सुडक्या : पन कसं वाचिवनार?

विक्रम : का ? आपण सरळ पोलिसांत जाऊन सांगू या, की आम्ही खराखुरा प्रकार पाहिलाय्. आणि काळूराम हाच खरा खुनी आहे.

सुडक्या : म्हंजी वाट लागली. ! आपुन काळूरामचं नाव घेतलं, तर त्यो आपल्याला शिल्लक तरी ठेवील का ? सुऱ्यानं आपलं बारीकबारीक तुकडं करून टाकील त्यो.

माला : अग बाई, ग ! मग आता ?

सुडक्या : आपुन पाहयल्यालं अजिबात कुठं बोलायचं न्हाई.

माला : आपली तिघांची गोल्डन गँग ! थी ग्रेट गोल्डन गँग ! आपल्या तिघांपैकी कोणीच बाहेर बोलायचं नाय. तशी शपथ घ्यायला हवी.

विक्रम : साधीसुधी नाही ! रक्ताची. अशा विशेष बाबतीत साधी शप्पथ घेऊन चालायचं नाही. थांब ..तुझ्याकडे पीन आहे?

माला : कशाला ? ही घे.

विक्रम : [सुडक्याला] एखादा खापरीचा तुकडा आहे. का बघ.

सुडक्या : मसणवटीत काय खापरांस्नी तोटा ? ह्यो घे ! पर त्येचं करनार हायेस काय ?

विक्रम : यावर मी [खिशातून चाकू काढून] या खुणा केल्या. हा आपला करार. [बोटाला पीन टोचून] आता प्रत्येकानं रक्तानं आपलं पहिलं अक्षर लिहायचं. मी लिहिलं - व्ही [मालाला पीन देतो.]

माला : इंग्रजीत व्ही लिहिलंस, की मराठीत वी ?

विक्रम : कुठलंही धर. हं - आता तू लिही !

माला : [पीन टोचून लिहिते] लिहिलं. [सुडक्याला] घे !

सुडक्या : मला कुठं येतं लिहिता वाचता ?

विक्रम : मग अंगठा उठव [तो तसं करतो] आता म्हणा. आम्ही शपथ घेतो, की आम्ही पाहिलं, ते कुणाला सांगणार नाही !

माला : पाहिलं, ते कुणाला सांगणार नाही !

सुडक्या : (तिच्याबरोबर) पाहयलं, त्ये कुनालावी सांगनार न्हाई !

विक्रम : आता हा खापरीचा तुकडा आपण जमिनीत पुरायचा! (तसं करतात.) झालं ! आता आपण एकमेकांच्या रक्ताची शपथ घेतली !

माला : काय मज्जा आली, नाही ! आता आपल्यापैकी कुणीही एकजण बोलला, तरी दुसरा दोघं पटकन् मरून जातील, होय ना ?

सुडक्या : अरे, बाप, रे ! ..काळूर म परत येतोय् ! लपा....लपा लौकर, त्यानं पाहयच्या आत !

[ते लपतात. काळूराम येतो. सोबत फौजदार आणि एक हवालदार.]

काळूराम : फौजदार – या मसणवटीच्या दारावरूनच पळत जाताना पाहिलं मी किसनला ! मला संशय आला ...न् मी लगेच तुमच्याकडे आलो !

हवालदार : (प्रेत पाहून, दचकून) साहेब, हे बघा काय ?

फौजदार : (खाली वाकून) डॉक्टर ! अरे, बाप, रे ! यांचा तर खून झालाय् !

काळूराम : म्हंजे ? किसननं तर त्यांना मारलं नाही ?

फौजदार : हवालदार, किसनला असेल तसा घेऊन या ! नाहीतर तो पळून जाईल !

हवालदार : जातो, साहेब !

[जाऊ लागतो, इतक्यात किसन येतो.]

किसन : काळूराम ...मला नंतर आठवलं सुऱ्यावर माझ्या बोटांचे ठसे आहेत.

काळूराम : मग ? सुरा परत न्यायला आलास तू ?

फौजदार : काय म्हणतोय् किसन ?

किसन : ( भीतीनं त्याला रडू फुटतं. ) मी नाही, हो, खून केला.... खरंच....मला काही आठवत नाही !

फौजदार : आठवत नाही म्हणतोस, मग ठसे असलेला सुरा बरा न्यायला आलास....? आता सगळ एकदा सांगून टाक ?

किसन : मी काय सांगणार ? तुम्ही म्हणाल, ते मला कबूल आहे. खून केला, तेव्हा मी दारूच्या नशेत होतो .... मला काही आठवत नाही.

फौजदार : बस बस ! पुष्कळ बडबड केलीस ! दारूड्या तो दारुड्या आणि वर खुनी ! हवालदार ...याला लॉकअपमध्ये टाकायला पाहिजे ! आणि आपल्या डॉक्टरला घेऊन नंतर प्रेताचा पंचनामा करायला हवा ! काळूराम आम्ही येतो. तोवर तुम्ही थांबा प्रेताकडे. [किसनला] चल भाडखाव !

[ते तिथे जातात. काळूराम मजेत प्रेताजवळ येतो. एवढ्यात पांढरी चादर पांघरलेली माला झाडाआडून पुढं होते. काळू-राम विलक्षण घाबरतो.]

काळूराम : बा ऽ परे भू – भूत – ! [ पळून जातो. इतर दोघे लपलेल्या जागेतून बाहेर येतात. ]

माला : हे ऽ कसा घाबरवून सोडलाय् ! पळत सुटला !

विक्रम : हां... काळूरामला काय तू अितका कच्चा समजू नकोस ! एकदम दचकला असेल तो....पण परत आल्याशिवाय राहतो का बघ !

माला : चल....तो येण्याच्या आत आपण अिथून पळून जावूया !

विक्रम : थांब... त्याची गंमत करू या !

[विक्रम डॉक्टरांच्या प्रेतामागं जातो. आणि प्रेताला बसतं करून त्याच्या मागं लपतो. काळूराम परत येतो. ]

काळूराम : काय घाबरायचं नाही ! मसणवटीत असं कायबाय दिसायचेच! त्याला मर्दानं घाबरून कसं चालेल ? [ समोर बसलेल्या डॉक्टरच्या प्रेताला पाहून ] आं ! प्रेत कसं ऊठून बसलं. मेलो .. मेलो.... [ पळू लागतो ]

विक्रम : (डॉक्टरांच्या मागून ...थोड्या गंभीर आवाजात) थांब... [ काळूराम थांबतो ] तू मला ठार मारलंस नाही का ?

काळूराम : ऑ ? डॉक्टरांचा आवाज बदललेला दिसतो. पण गेल्यानंतर माणसाचा आवाज बदलेल, नाहीतर काय ?

विक्रम : बिचाऱ्या गरीब किसनवर आळ घातलास ! [ डॉक्टरांच्या कोटातून पाठीमागून हात घालून त्यांना उभं करीत ] जा आधी -- फौजदाराकडे जाऊन गुन्हा कबूल कर.

काळूराम : (उभ्या राहात असलेल्या डॉक्टरांकडे पाहून ) आं ! ही आणखी काय भुताटकी ? फौजदार मला... वाचवा ! [ पळू लागतो. पण दुसऱ्या बाजूनं पांढरी चादर पांघरलेली माला त्याची वाट अडवते. ] मेलो ऽ ही भुतं मला जिवंत सोडणार नाहीत !

[ मागं येतो – तर डॉक्टर त्याच्या दिशेनं चालत येत असलेले. ]

विक्रम : कबूल कर....आधी फौजदाराकडे जाऊन गुन्हा कबूल कर. [ काळूची घाबरगुंडी. ती पाहून सुडक्या हसतो. ]

काळूराम : ऑ ? कोण हसलं आता ? [ एवढ्यात माला हसते ] मुलीचा आवाज आला ! [ तिघेही हसतात ] ऑ – डॉक्टरपण हसताहेत. नक्कीच....नक्कीच ही भुताटकी नाही. !

[ मालाच्या डोक्यावरची चादर ओढतो ] तू -- तू कोण आहेस ? आणि चादर पांघरून मला भेवडायत होतीस नाही का ? थांब, तुझी भरली आता शंभर वर्षं.

[ तिला मारायला धावतो. विक्रम डॉक्टरचं प्रेत टाकून मध्ये पडतो. ]

विक्रम : खबरदार, तिच्या अंगाला हात लावलास तर! माला, पळ लौकर.

[माला पळून जाते. काळूराम विक्रमच्या अंगावर धावून जातो.]

काळूराम : तू – तू इतका वेळ मला डॉक्टर म्हणून फसवत होतास! [त्याला मारायला धावतो. इतक्यात सुडक्या पाठीमागून ठोसा मारतो. काळूराम वळतो. विक्रमही त्याला मारू लागतो. थोडीशी झटापट होते. अखेरीस म्हणजे तो खून पडला तेव्हा तुम्ही इथंच होता – आणि तुम्ही मला खून करताना पाहिलंत!

विक्रम : हो – अणि गरीब बिचाऱ्या किसनला वाचविण्यासाठी आम्ही ते फौजदाराला सांगूच सांगू. तो सुटेल आणि तू फासावर लटकशील.

काळूराम : ते फौजदाराला सांगायला तुम्ही शिल्लक राहणार नाही उंदरांनो.

[बाजूची कुदळ उचलतो. ती उगारून त्यांच्या मागे लागतो. ते पळत सुटतात.]

# अंक – २ रा.

## प्रवेश – १ ला.

[ चिचुंद्री बेटावर.
सकाळ झालेली.
सुडक्या उठून बसलेला. विक्रम आणि माला
एकेका बाजूला झोपलेली. ]

सुडक्या : इक्रम - उठतोस ना ? सूर्य, बग, किती वर आला !
विक्रम : झोपू दे ग, मावशी - अजून शाळेला पुष्कळ वेळ आहे !
सुडक्या : अरं, साळा कसली ? हितं साळा न्हाई !
विक्रम : नाही ना शाळा ? मग कशाला उठवतेसयूस मला ?
सुडक्या : थांब तू - तसा न्हाई उठायचास !

[बाजूची एक काठी घेऊन त्याच्या कानात गुदगुल्या करतो.]

विक्रम : रमण, तू चावटपणा करू नकोस हां - सांगतोय तुला !
सुडक्या : अरे, बाबा - हितं मावशी न्हाई, रमण न्हाई ! मी हाय मी सुडक्या !
विक्रम : [ एकदम उठून बसून ] सुडक्या ? तू कसा इथं ?
सुडक्या : कसा म्हंजी ? तू तसा मी !
विक्रम : म्हणजे ? आपण आहोत कुठं ?
सुडक्या : चिचुंद्री बेटावर.
विक्रम : काहीतरी सांगू नकोस चिचुंद्री बेटावर कसे येऊ आपण ?
सुडक्या : बस का ? रातीचं इसरलास ?
विक्रम : हां - आत्ता आठवलं ! आं ? म्हणजे ते खरंच घडलं होय ? मला इतका वेळ वाटत होतं - की ते स्वप्नच ! बापरे, ! काय काय भयंकर गोष्टी घडल्या काल रात्री !....आपण स्मशानात गेलों....तिथं डॉक्टरांचा खून झाला !....आणि खुनी काळूराम

कुदळ उगारून आपल्या मागं धावत सुटला !....आपण तिघं पळत सुटलो....मी, तू आणि माला ! आं ? माला पण होती आपल्याबरोबर ? मग ती कुठाय् ?

सुडक्या : ती काय ? थितं झोपलीय्.

विक्रम : माला, ऊठ ! ऊठतेस ना –

[ ती ऊठून पळू लागते. ]

माला : पळा, पळा, काळूराम आला !

विक्रम : अग, कुठाय् काळूराम ?

माला : माझ्या मागं लागला होता....मी पळाले....झुडपात लपून बसले. मग तुम्ही दोघं आलात आपण तिघंही जीव घेवून पळालो....

विक्रम : आपण नदी काठापर्यन्त आलो....काळूराम आपला नाद सोडून मागं परतला...आपण नदीवर एक तराफा होता, त्यावर बसून इथं आलो....चिचुंद्री बेटावर....

माला : मला अशी झोप येत होती ! कशीबशी मी येवून पोहोचले आणि ताणून दिली ! पण अय्या, म्हंजे हे चिचुंद्री बेट आहे ?

विक्रम : चला....आता चहा पिऊ या !

सुडक्या : चहा ? चहा कुटनं येणार हितं ?

विक्रम : का ? माला करील की !

सुडक्या : कशाचा करणार ? हित काय दूध हाये, का भुकी, का भांडीकुंडी ?

माला : म्हंजे ? आपल्याला इथं खायला प्यायला काहीच मिळायचं नाही ?

सुडक्या : वा... मी तर आपल्या गावात बी असाच राहतो....माला, कुटं हाय घर का भांडीकुंडी ?....काय काळजी नगा करू. मी थोड्या येळानं जाईन तराफ्यावरून गावात, आन् लपून छपून खायचं प्यायचं गोळा करून आणीन !

माला : काय मज्जा नाही? पाठीमागं आईची कटकट नाही एक सारखी - काम कर! काम कर! म्हणून.

विक्रम : आणि मावशीचा त्रास नाही! अभ्यास कर! अभ्यास कर, म्हणून! आता काय करायचा तो अभ्यास एकट्या रमणला करू दे! आपल्याला तर अंघोळसुद्धा करायला नको!

माला : म्हंजे रोज रोज ट्रिपलाच आल्यासारखं! शाळेबिळेचा त्रासच नाही.

विक्रम : इतर मुलांना कळलं, तर ती काय जळतील नाही आपल्या-वर? काय मज्जा आहे! जन्मभर आता आपण या चिचुंद्री बेटावरच राहायचं.

आता आपली मज्जाच मज्जा
विसरून जायचं नाव—विसरून जायचं गाव
जो तो आपल्या मनचा राजा
आता आपली मज्जाच मज्जा
सकाळी उठायचं....

सुडक्या : अं हं .. दुपारी उठायचं!

दोघे : दुपारी उठायचं... पोहायचं, खेळायचं

माला : झाडावर चढायचं, भटकायचं, झोपायचं

विक्रम : पुन्हा दुसऱ्या दिवशी ...

दोघे : दुपारी उठायचं पोहायचं खेळायचं

माला : झाडावर चढायचं भटकायचं झोपायचं

तिघे : आठवड्यात सातीच्या साती रविवार
नियमांचा बाजा, शिस्तीचा फज्जा
आता आपली मज्जाच मज्जा.

माला : बाबा मला म्हणतात, तू पुढं डॉक्टरीण व्हायचंस. पण इथं राहून मला कसं होता येईल डॉक्टरीण?

विक्रम : का? हवतर मी आणि सुडक्या आजारी पडू.

सुडक्या : पाळीपाळीनं

विक्रम : हो....आणि तू आम्हांला तपास. म्हंजे झालीस तू डॉक्टरीण.

माला : आहाहा, रे! डॉक्टरीण व्हायचं, म्हणजे शाळेंत नको वाटतं जायला?

विक्रम : पण इथं शाळाच नाही. म्हणजे आपल्याला डॉक्टर....इंजीनीअर प्रोफेसर असलं काहीच व्हायला लागणार नाही,

सुडक्या : मग कोन व्हनार तुम्ही? साधुबाबा? बंभोलेनाथ!

माला : साधू? म्हंजे ते अंगाला राख लावायची? जटा बांधायच्या असलं? नकोरे, बाबा. हातातनं उदी....घड्याळं पण काढावी लागतात मग.

विक्रम : ते एकवेळ चालेल. पण प्रार्थना म्हणायची आणि जप करायचे वगैरे ते कोण करणार?

माला : मग साधू होणं कॅन्सल? मग दुसरं काय होऊया आपण!

विक्रम : मी सांगू? – आपण डाकू व्हायचं! टोळी काढायची! आपल्या टोळीचं नाव काय माहीतेय..? धि ग्रेट गोल्डन गँग!

तिघेही : धि ग्रेट गोल्डन गँग झिंदाबाद.

माला : मला किनई, हेमामालिनी व्हायचं होतं....पण आता फुलनदेवी....आपलं मालनदेवी व्हायला लागणार!

विक्रम : बरोबर! मी डाकूंचा सरदार विक्रमसिंग ... हा सुडक्यासिंग
मी डाकू सरदार
हा डाकू सरदार
तू डाकीण अन् मालनदेवी ...

माला : अय्या ... डाकू बाईला काही डाकीण नाही म्हणत....

विक्रम : मग काय म्हणतात?

माला : नुसतं डाकूच म्हणतात. पुरुषांची बरोबरी करायला. आईला आनंद होईल. मी डॉक्टरीण न होतां डाकीण झाले....आपलं डाकू झाले, तरी पुरुषांची बरोबरी केली, म्हणून.

विक्रम : मी डकू सरदार

सुडक्या : मी डाकू सरदार

माला : मी डाकू सरदार

तिघे : तिघेही राहू मस्तीत आपल्या दुनियासे आजाद
गोल्डन गँग झिंदाबाद
गोल्डन गँग झिंदाबाद.

विक्रम : डाकू विक्रमसिंग ! चिचुंद्रीच्या खोऱ्यात धुडगूस घालणारा
कुप्रसिध्द डाकू ! माझ्यापासून खतरा है फार
पकडू देणारास इनाम मिळणार
रुपये पंचावन्न हजार

सुडक्या : एवढे मिळतील तुला पकडून देणाऱ्याला ?

माला : हो ! जिवंत वा मेलेला !

विक्रम : मेलेला ?

माला : हो. अशीच पध्दत ठरली आहे !

विक्रम : तर मग, पोलिसांच्या गोळीबारात....मीही मराया तय्यार आहे !

[ सुडक्या धाडधाड गोळीबार करतो. विक्रम खाली पडतो....
माला रडू लागते. अर्थात् सगळं खोटं खोटं ]

मेल्यानंतर तुम्ही मला
पकडून द्या हो पोलीसला
घेवून पंचावन्न हजार
तिघेही उडवू मौज बहार
मौज बहार... मौज बहार
तिघेही उडवू मौज बहार !
बेटावरती घुमतील आता
बंदुकीचे पडसाद
गोल्डन गँग झिंदाबाद
गोडल्न गँग झिंदाबाद

माला : हवेत उमदे अबलख घोडे
काडतुसांचे पट्टे थोडे

सुडक्या : काडतुसं ? आणि बंदुका नको वाटतं ?

विक्रम : बंदूक हवीच....डोईस फेटा
पायी गमबूट.. भलता मोठा

माला : अय्याऽ ! गमबूट कशाला ? इथं वर्षभर पाऊस पडतो, की काय ?

विक्रम : चमच आहेस ! पावसासाठी नाही काही – पण डाकूंना घालायलाच लागतात गमबूट ! तू सिनेमात पाहिलं नाहीस वाटतं ? (सिनेमातल्या हिरोची नक्कल करीत) "मौसी इस समय पोलीस मेरा पीच्छा कर रहे है । बोल तेरा भगवान मुझे बचायेगा की नही ?"

फिल्मी डाकूवरती ताण
शत्रूची करू दाणादान
होऊन जाईल अशी आपुली
आबादी आबाद
गोल्डन गँग झिंदाबाद
गोल्डन गँग झिंदाबाद
हां ! आता शपथ घ्या.

माला : पुन्हा रक्तानं... ?

विक्रम : हो .... मग ? गोल्डन गँगची शपथ काय साधीसुधी असते ?

माला : नाही....पण रात्रीच्या धावपळीत माझी पीन कुठंतरी पडली !

विक्रम : मग नुसतंच म्हणूया. हम कसम खाते हैं ...

माला : अय्या ... हिन्दीत खायची कसम ?

विक्रम : मग ? डाकू काय मराठीत शपथा घेतात ? हं – म्हणा – हम कसम खाते हैं....कि... कि

माला, सुडक्या : हम कसम खाते हैं कि कि....पुढं काय ?

विक्रम : थांबा, मला जरा विचार करू द्या ..

माला : पण कसम खायच्या आधी दुसरं नाही का काही खायला मिळायचं ? मला इतकी भूक लागलीय् ! सुडक्या, बघ ना काही खायला मिळतं का ते ?

सुडक्या : इक्रम .. चल तू सुद्धा.

माला : मग मी नाही एकटीच इथं बसणार ! मला एकटीला भीती वाटते !

विक्रम : हां....सुचलं ! हम कसम खाते हैं कि हम तीनों हमेशा साथ रहेंगे ! किसीभी हालत में किसी एकको अकेला छोडके नहीं जायेंगे ! म्हणा ! [ते ती वाक्ये परत म्हणतात] ठीक आहे ! सरदार सुडकेसिंग ! तुम्ही बेटावर पहारा ठेवा ! काही विशेष हालचाल दिसली, तर आम्हाला लगेच कळवा !

सुडक्या : जसा हुकूम, सरदार इक्रमसिंग !

[एक काटकी खांदयावर बंदुकीसारखी धरून ऐटीत जातो.]

माला : आपण कधीच म्हणजे कधीच परत गेलो नाही, तर घरी आपली काळजी करतील का, रे ?

विक्रम : हो तर....मला वाटतं आता सुद्धा मावशी माझी काळजी करीत असेल.

माला : हो ना ... माझी आई पण काळजी करत असेल.

विक्रम : मावशीची खात्रीच होईल, की मी हरवलो.

माला : तुझ्यासारखीच मीही हरवले, असं माझ्या आईला वाटेल.

विक्रम : मग तिला आनंद होईल ना ? तू माझी बरोबरी केलीस, म्हणून ?

माला : विक्रम आपण नाहीसे झालो, याचं फार दुःख होत असेल नाही, रे, त्यांना ?

विक्रम : तर....! त्यांच्या डोळ्यांतून पाण्याच्या धारा पडत असतील ! टपाटप टपाटप अशा !

माला : मग, विक्रम, आपण त्यांना दुःख देवून असं निघून येणं चांगलं का, रे ?

विक्रम : वाईट....अगदी फारच वाईट. पण करणार काय ? आपल्या-सारख्या लुटारू डाकूंच आयुष्यच हे असंच !

माला : खरं आहे. डाकू व्हायचं म्हणजे आई....मावशीचा विचार करून कसं चालेल ? खरं म्हणजे मला आईच्या आठवणीनं इतकं रडू येतंय्. पण मी रडणार नाही. चिचुंद्रीच्या खोऱ्यात धुमाकूळ माजवून राहिलेल्या मालनदेवीला रडून कसं चालेल ? शिवाय मी रडायला लागले, की आई नेहमी म्हणते... रडतेस काय एखादया मुलासारखी ?

विक्रम : शिवाय आपण खुप जायचं म्हणू....म्हजे एखादवेळी म्हणूच कारण मावशीनं मुरंबा केलाय्. तो मला नाही वाटत फार दिवस टिकेल असं... [ त्वेशानं ] रमणंन जर का एकट्यानं बरणी संपवली ना, तर ती त्याला कधी कशी पचायची नाही— पोटदुखीनं नुसतं गडबडा गडबडा लोळावं लागेल म्हणावं— तर त्या मुरंब्यासाठी आपण परत गेलो असतो....पण काळूराम काय ? तो तर आपल्याला पाहिल्याबरोबर मारून टाकील तो तुरूंगात गेल्याशिवाय आपण घरी परत, जाऊच शकत नाही !

माला : पण आपण स्मशानात पाहिलेला प्रकार पोलिसांना सांगेपर्यंत काळूराम तुरूंगात जाणार कसा ?

विक्रम : म्हंजे आपण गावात जात नाही, म्हणून तो तुरूंगात नाही. न् तो तुरूंगात जात नाही, म्हणून आपण गावात जात नाही. च्यायला, चांगलच आहे राव !

माला : शिव्या काय देतोस ?

विक्रम : मग ? धि ग्रेट गोल्डन गँगचे नायक काय रमण सारखे बोलणारेत ? मावशी... हा बघ कसाऽ असं !

[ सुडक्या पळत येतो. ]

सुडक्या : तिकडं पाहयलं ?....तिकडं....नदीच्या त्या काठाला... ?

विक्रम : [ लांबवर पहात ] गावातली माणसं जमलेली दिसताहेत. होड्याही फिरताहेत पाण्यात....आज कशाला बरं सगळी जमली असतील ? आज काही सणबिण नाही.

सुडक्या : पाण्यात शोधतायत काय तरी....

माला : काय शोधत असतील?

विक्रम : बुडालं बिडालं असेल कोणी तरी.

सुडक्या : मी असतोना थतं....तर आत्ता शोधून दिला असता न योक बंदा रुपाया मिळिवला असता!

माला : खरंच! शोधायला काय मजा आली असती! पण कोण बुडालं असेल?

विक्रम : ते कसं सांगणार? कोणीही असेल! [एकदम काहीतरी सुचून] हाँ....मी सांगतो कोण बुडालं, ते?

माला-सुडक्या : कोण? कोण बुडालं असेल?

विक्रम : आपणच!

माला : म्हंजे?

विक्रम : [खदखदा हसून] एवढं कळत नाही? ते लोक आपल्यालाच शोधताहेत!

माला : खरंच कमाल आहे नाही आपली? आपण कित्ती छान हरवलोय! सगळ्या गावात लोक आज आपलीच चर्चा करत असतील! म्हणत असतील, कित्ती चांगली मुलं होती! बापडी बुडून मेली!

विक्रम : काळूरामला पण तसच वाटत असेल! काळूराम अब दुनिया की कोईभी ताकत तुमको धि ग्रेट गोल्डन गॅगसे बचा नही सकती गरीब बिचाऱ्या किसनवर तू अन्याय केलास! अभी गोल्डन गँग तुम्हारा इन्साफ करेगी! बोला ...धि ग्रेट गोल्डन गँग झिंदाबाद! धि ग्रेट गोल्डन गँग झिंदाबाद!

(काळोख)

## प्रवेश – २ रा

[तिथंच तीन-चार दिवसांनी]

माला : विक्रम, चार दिवस झाले, आपण चिचुंद्री बेटावर येऊन पडलो त्याला.

विक्रम : पडलो? आपण आपोआप नाही येऊन पडलो. मुद्दाम तराफ्यावरून आलो! मजा करायला!

माला : असेल पण मला नाही मजा वाटत.

विक्रम : ॲई - चार दिवसांपूर्वी तर तुला खूप मजा वाटत होती. मग आजच तुला कशी एकदम मजा वाटेनाशी झाली? मी तरी बुवा, भयंकर मजा करतोय.

माला : काय करतोस? गेल्या चार दिवसांत तू एकसुद्धा गोष्ट केली नाहीस. नुसता पोहोलास आणि झोपून राहिलास!

विक्रम : अग, हीच तर मजा. घरी असतो, तर असं नुसतं झोपून राहायला कसं मिळालं असतं? आणि परवा नाही का सुडक्याचा चाकू हरवला तेव्हाचं आपलं साहस?

माला : हॅ....त्यात कसलं आलय् साहस? तुम्ही दोघे दोन दिशांना शोधायला गेलात आणि दमून तिथंच झोपून राहिलात, मी बापडी इकडे वाट बघतेय्....बघतेय्! मला एवढी भीती वाटली ... !

[कुणाची तरी चाहूल लागते]

विक्रम : [लांबून सुडक्याला] कोण आहे!

सुडक्या : शेरदिल हथियारा नंबर ट्रट्रट्र –

विक्रम : खरं नाव?

सुडक्या : डाकू सरदार सुडक्यासिंग

विक्रम : परवलीचा शब्द

सुडक्या : रगात

विक्रम : ठीक है ! आप आ सकते है !

[सुडक्या द्रोणांत फळं घेऊन सरपटत येतो. मग उभा रहातो.]

सुडक्या : घ्या एकदम ताजी हायेत.

माला : असू दे माझ्या नजरेसमोर नकोत ती.

[रागानं फेकून देते.]

सुडक्या : असं काय करावं ? फळं न्हाई खाल्ली, तर पोट कशानं भरणार ?

माला : असू दे. मी राहीन उपाशी. पण एकसारखी ती आंबट फळं खाऊन माझे दात अगदी आंबून गेलेत.

विक्रम : आणि तिकडे गावात एकसारखी चिंचा खायचीस ती ?

माला : तिथली गोष्ट वेगळी होती ! तिथ आई होती, माला, चिंचा खाऊ नकोस, दात आंबतील, असं म्हणायला. इथं कोणीच नको म्हणत नसताना आंबट खाण्यात काय गंमत ? मला दुसरं कायतरी खायाला हवं !

सुडक्या : त्या दिवशी थोडं थोडं खायाला आणलं, ते दोन दिवस पुरलं. आता आज दुपारच्याला परत जाईन आन् काय तरी चोरून आणीन. मग तर झालं ?

माला : चोरून ? सुडक्या, तू ते सगळं चोरून आणलं होतस ?

सुडक्या : चोरून नायतर ? लोकांनी मला पायलं असतं म्हंजे आपला बेंडबाजा वाजला असता न्हव ?

माला : शी ! आपण चोऱ्या करतो, असं आईला कळलं, तर ती मला कधीच परत घरात घ्यायची नाही.

विक्रम : अग, पण हवंय् कशाला तिनं घरात घ्यायला ? आपण मुळी इथंच कायम राहून डाकू व्हायचंय् ना ? आणि आपण आता थोडीच शाळेतली मुलं आहोत ? आपण आहोत डाकू ! डाकूंनी चोऱ्या करण्यात पाप कसलं ?

माला : ते काही नाही! मी आत्ताच्या आता घरी जाणार!

विक्रम : का? आईची आठवण येते वाटत?

माला : हो. येते! येते!! येते!!! काय म्हणायचंय् तुला? तुमची आई नाही, म्हणून तुम्हांला काही वाटत नाही. पण मला आईच्या आठवणीनं.... [रडते]

विक्रम : चूप- रडतेस काय अेखादया मुलीसारखी? आपलं मुलासारखी. इतकं असेल तर जा घरी. इतके दिवस बाहेर राहिल्याबद्दल खा आईचा मार! त्यातन तो काळूराम टपलाच आहे तुला पकडायला!

माला : उगाच घाबरवू नकोस. मी जाणार म्हणजे जाणार. ही मी घरी चालले. सुडक्या तू पोचवशील ना मला तरफ्यावरून?

सुडक्या : चल.

विक्रम : थांब, सुडक्या. !

माला : चल, सुडक्या. !

विक्रम : थांब सुडक्या. !

माला : चल रे. [त्याला खेचून नेऊ लागते.]

विक्रम : थांबा... मालनदेवी... सरदार विक्रमसिंगाला विरोध करून तुम्हांला असं जाता येणार नाही! चला....होऊन जाऊ दे लढाई.

[अेक काठी तिच्याकडे टाकतो. दुसरी स्वतः तलवारींसारखी उगारतो.]

माला : होऊन जाऊ दे. [दोघंही थोडावेळ काठ्यांनी लढाई करतात.]

सुडक्या : [मध्ये पडून] ए...हे काय चालवलंय् तुम्ही? इक्रम, तिला जायचं असेल, तर जाऊ दे ना! [लढाई थांबते.]

विक्रम : खुशाल जाऊ दे. तिला माहीत नाही, की अशा निर्जन बेटावर नेहमी खजिना पुरून ठेवलेला असतो. हिरे-माणकं आणि खूप काय काय. तिला जाऊ दे. सुडक्या, आपणच

तो शोधायला लागू या. खजिना सापडला, की मग काय धमाल ! एका बापडीला खजिन्यातला वाटा ना–ही.

माला : तूच शोध तो खजिना. मी जाते घरी. चल, रे, सुडक्या घरी परत.

सुडक्या : [ हळूच ] इक्रम.

विक्रम : सुडक्या तू .. तू पण फिरलास ?

सुडक्या : मला बी....जावं वाटतंय्.

विक्रम : चालते व्हा. मला एकट्याला या बेटावर टाकून तुम्ही दोघं परत जा. मी एकटाच मजा करीन. खेळीन, पोहीन, झोपेन. [ हिरमुसलेला. ]

सुडक्या : मग तू पण चल की, रं, आमच्या बरोबर.

विक्रम : मी नाही येणार. मला इथंच रहायचं आहे. मी इथंच रहाणार आहे.

माला : चल ना, रे, विक्रम. हवंतर आम्ही थोडावेळ थांबतो तुझ्यासाठी.

विक्रम : काही नको उपकार. सबंध जन्मभर थांबलात, तरी मी येणार नाही.

सुडक्या : मग आम्ही जाऊ ?

विक्रम : जा ना. खुशाल जा. मी काय तुम्हांला धरून ठेवलंय् ? म्हणे, शेरदिल हथियारा, नंबर टूटूटू. चालले रडत. [ ती दोघं जाऊ लागतात. ती थांबतील अशी त्याला शेवट-पर्यंत आशा. पण थांबत नाहीत. शेवटी तो मोठ्यानं ओरडतो. ] माला ...सुडक्या ...[ ते परत येतात. ] तुम्ही सरळ निघून चाललात. आपण काय कसम खाल्लीय् ? गँगमधल्या कोणालाही एकटं टाकून जायचं नाही. मग ? तुम्हांला शपथ मोडून कसं जाता येईल ? [ माला आणि सुडक्या विचारात पडतात. एवढ्यांत ढगांचा गडगडाट होतो. विजा चमकतात. ]

सुडक्या : इक्रम – वादळ येतय ! कुठंतरी आसऱ्याला जाया होवं.

[ ते पळत झाडाच्या आसऱ्याला जातात. ]

माला : मला वादळाची भीती वाटते. आपण घरी जाऊ या.

सुडक्या : माझं ऐकणार का, इक्रम ? आपून तिघंबी घरी जाऊ या. चोरून छपून जाऊया. तिथं काय चाललंय्, ते समदं पाहू या ! आन् मग ठरवू या तिथं राहायचं, का हितं परत यायचं, ते !

माला : बरोबर आहे, सुडक्याचं ! आपण तिथं जाऊनच ठरवूया काय करायचं, ते !

विक्रम : ठीक आहे. गोल्डन गँगच्या नायकाला तुम्हांला एकटं सोडता येणार नाही, म्हणून मीही तुमच्या बरोबर.

म. ग्रं. स. ठाणे, ग्रंथालय शाखा.
दा. क्र. २०५११ नों. दि. २८/३/८५
वि. बाल नाट्य

## प्रवेश – ३ रा.

[दुसऱ्या दिवशी दुपारी. विक्रमच्या मावशीच्या घरी. मावशी आणि रमण.]

मावशी : रमण, जा, बाबा, तू तरी खाऊन घे घासभर भात !

रमण : आणि मावशी, तू, ग ?

मावशी : माझी अन्नावरची वासनाच उडालीय बाबा - पोरं गेल्यापासून ! त्यातनं आज तर ... भटजी पोरांचे क्रियाकर्म करायला येणार ! मग मला जेवण जाईल का, रे, बाबा ?

रमण : खरंय् , मावशी.

मावशी : पण तू जेव हो ! ... तुझे हाल करून चालायचं नाही. आता तू एकटाच उरला आहेस ! ... तुला तरी जपलं पाहिजे.

रमण : पण आज विक्रमचा अंत्यसंस्कार....आणि मी जेवणं बरं दिसेल का ?

मावशी : काही नाही, हो, लहान बालकाला ...मुलांनी भूक मारू नये अशी जा....जेवतोस ना ?

रमण : [हळूच] मी जेवलो मघाशी. [थांबून] मला खात्रीच होती, तू मला जेवायला लावशील याची.

[विक्रम हळूच येतो .... आणि अंगणातल्या झाडाआड लपतो.]

मावशी : आत्ता कुणीतरी आल्यासारखं वाटलं का, रे ?

रमण : हो ? मी नाही पाहिलं !

मावशी : नाही .... विक्रम असाच यायचा, हो, चपळपणानं ! आणि कुठं तरी दडून बसायचा कधीकधी !

रमण : तू एकसारखा विक्रमचाच विचार करतेस ना म्हणून तुला तसा भास झाला ....

मावशी : विक्रम माझा चांगला होता, हो! पण त्या आडचावळ कारट्याच्या नादानं वाया गेला....

रमण : कोण आडचावळ कारटा? सुडक्या?

[एवढ्यात सुडक्या येऊन घराच्या एका बाजूला लपतो.]

मावशी : नाव नको घेऊ मेल्याचं. काय त्याचे गुण....त्यानंच यांना कुठं तरी नेऊन अखेरीस ....

रमण : स्मशानात – [तोंड झाकून घेतो.]

मावशी : कारट्या....अभद्र बोलतोस? माझी खात्री आहे - गाव काहीही म्हणाला, तरी विक्रम जिवंतच....[माला धावत येते आणि भिंतीआड लपते] काय तरी मेले माझे डोळे झालेयत्! असं कोणीतरी भर्रकन आल्यासारखं मला वाटलं!

रमण : हो....माला असेल

मावशी : म्हंजे तुला पण दिसली?

रमण : नाही....मला नाही दिसली! पण तुला भास होताहेत ना? मघा विक्रमचा झाला! म्हंजे आता कोणाचा होणार! मालाचाच!

मावशी : अगदी खुळ्यात काढा हो मला !

[मालाची आई-- सुशिलाबाई येते. ओक्साबोक्सी रडते.]

सुशिला : मावशीबाई....असं कसं, हो झालं?

मावशी : काय सांगायचं सुशिलाबाई....नशीब आपलं!

सुशिला : हो ना! नाहीतर बिछान्यात झोपलेली मुलं आपली एका एकी नाहीशी होतात....म्हंजे काय समजायच?

रमण : म्हंणजे ती स्मशानात ....

मावशी : गप बस डामरटा· अभद्र बोलशील पुन्हा?

सुशिला : माझ्या मालासारखी मुलगी जन्मात सापडायची नाही! थोडी हूड होती ....

रमण : हो ना ...एकदा विक्रमशी मारामारी केली!

सुशिला : [त्याच्याकडे चिडून पहात] ... पण मनानं इतकी चांगली होती एकदा माझ्या अंगावर फटाका टाकलान्....पण तो चांगल्या मनानं बरं! मी तिला अशी झोडपलीय...पण ते सुध्दा चांगल्या मनानं बरं! मलाकाय ते स्वप्न पडलं होतं हे असं होणार, म्हणून? आता तिनं माझ्या अंगावर फटाक्यांची लडच्या लड लावली, तरी मी तिला एका शब्दानं बोलायची नाही, हो ऽ! [रडू लागते. त्याबरोबर भिंतीआड मालालाही रडू अनावर होतं.] आं .... आणखी कोण रडलं

मावशी : मलाच, हो....मलाच रडू आलं! मी मेली विक्रमच्या पाठीत असे धपाके घालायची! मला त्याचे गुण तेव्हा कळले नाहीत, हो डब्यातले लाडूबिडू कमी झाले, की मला आपलं उगाच वाटायचं, की त्यानंच ते घेतले ... आता का तो लाडू खायाला येणाराय! [रडते. इकडे विक्रमही नाक शिंकरतो.]

रमण : मावशी .... आता कोणी तरी नाक शिंकरलं .... शपथ!

मावशी : चूप बस्स! ... ही वेळ आहे का थट्टा करण्याची! [रडत] आपली बाळ गेली, हो ....

सुशिला : होय, हो....आपली बाळं गेली!

[दोघी गळ्यातगळा घालून रडतात. भटजी येतात.]

भटजी : सुशिलाबाई....मावशीबाई .... अहो,रडताय काय अशा गळे काढून! असें पाहा .... देवानें ती मुलें दिली .... तोच तीं घेऊन गेला आता रडून काय व्हायचंय!

सुशिला : पण भटजी....त्यांचं क्रियाकर्म करायला आणखी थोडं थांबता नाही येणार?

भटजी : अहो, तसें काय, जन्मभर सुद्धा थांबतां येईल. हो! पण काळूरामनें सांगितलें ना, की पोरें तडक नदीच्या दिशेनें गेली म्हणून? सबंध गावानें नदीत शोधलें, तरी त्यांचा ठावठिकाणा लागला नाहीं? म्हंजे तीं बुडालीं, असेंच नको का समजायला? सगळ्या गावानें अगदी पक्कें ठरवून टाकलें आहे, की पोरें बुडाली...बुडालीं... बुडालीं!

मावशी : सगळं गाव म्हणतं, तर करू या संस्कार! पण अगदी आजच हवा का तो करायला?

भटजी : न करुन कसें चालेल? आज अगदीं शेवटचाच चांगला दिवस! मग उद्यांपास्नं कृष्णपक्ष! म्हंजे स्वर्गाचें फाटक एकदम बंद! पोरांना काही स्वर्गांत ॲडमिशन मिळायची नाहीं उशीर झाला कीं! अगदी मुंबईच्या शाळांसारखेच आहे बघा तिथें! हं .... दक्षिणा काढा पाहूं आधीं!

[मावशी कनवटीचे पैसे भटजीना देतात.]

हं, सुशीलाबाई.... [त्याही देतात. एवढ्यात भैरू येतो,]

मावशी : काय, रे, भैरू...आज बरी सवड मिळाली कामामधून

भैरू : काम रोजचंच हाय, मावशीबाय. पण आजच्यासारखा दीस एखादाच! [डोळे पुसल्यासारखं करतो.] लई आठवण येते इक्रमची! लई इच्यारपूस करायचा तो माजी!

[हवालदार किसनला घेऊन येतो.]

मावशी : ही पिडा आणखी कशाला आली?

हवालदार : काय ऐकेना. हट्टच धरून बसला! म्हणून फौजदारांनी त्याला थोडा वेळ इथं येऊन जायची परवानगी दिली!

किसन : मावशीबाई, मी एक वाया गेलो दारुच्या नादानं! मी फासावर गेलो, तरी मला दुःख व्हायचं नाही!....पण विक्रमसारखा गुणी मुलगा .. त्याचं असं का, हो, करावं देवानं?

भैरू : अरे, जा जा! मोठी माणुसकी दाखवतोय! खून करतांना कुठं गेली होती!

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय ठा.
क्र. २०८९९ नों. दि. २८/७/८५

सुशीला : अगो, बाई....हाच का तो खुनी दारुड्या? आणि मी म्हणते हिंमत कशी झाली याची, आमच्यासारख्या चांगल्या माणसांच्या घरात शिरण्याची?

किसन : बाई, विक्रमची माझ्यावर भारी माया! मला नेहमी सांगायचा किसन, दारू पिऊ नको! मी ऐकलं नाही.. न् माझ्यावर हा प्रसंग आला! असल्या देवाच्या लेकरासाठी मी इथं येणार नाही, तर काय?

भटजी : म्हणे देवाच्या लेकरांसाठीं आलो! घालवा आधी! घालवा त्या खुनी माणसाला. त्याशिवाय मंत्र म्हणायला सुरुवात करतां येणार नाहीं!

मावशी : जा, रे, बाबा तू इथून! नाहीतर हे भटजी असे अडून बसतील!

किसन : मावशीबाई, मी काही त्रास देणार नाही! नुसता कोपऱ्यात बसून राहीन! भटजींना मंत्र म्हणू दे....मी विक्रमचे गुण आठवत इथं बसून राहीन!

मावशी : हां....भटजी! करा सुरुवात!

भटजी : अजिबात नाहीं करणार! अहो असला बदमाश माणूस इथें बसून राहिला, तर आमचे मंत्र कसे पोंचतील देवांपर्यन्त! तो बघा लख्ख दिसतोय् तुमचा विक्रम! तुमची मालासुध्दा स्पष्ट दिसतेय! त्या दोघांचेही आत्मे तळमळून सांगतातहे भटजीमहाराज, ह्या माणसाला आधी घालवून द्या! भटजी महाराज ....

हवालदार. : [किसनला] चल आता, झाली तेवढी शोभा पुरे झाली. चल परत कोठडीत.

भैरू : असा ऐकणार नाही तो. चांगला बडवला पाहिजे त्याला. [मारतो. हवालदार त्याला खेचत नेऊ लागतो.]

किसन : विक्रम....विक्रम....माझ्या सोन्या माझ्या राजा....

[विक्रम लपलेल्या जागेवरून एकदम बाहेर येतो.]

विक्रम : थांबा. त्याला मारू नका.

मावशी : विक्रम....

[त्याला मिठी मारते, तशी माला देखील बाहेर येते आणि सुशिलाबाईंना मिठी मारते.]

सुशिला : माला....

[सुडक्या बाहेर येतो व दिनवाना उभा राहतो.]

विक्रम : मावशी, माझ्याबरोबर सुडक्या पण आहे !

मावशी : [सुडक्यालाही जवळ घेते] ये हो. बिच्यारं आईवेगळं पोर ते. येरे, तूही आमचाच आहेस, हो.

किसन : मला वाटलंच, विक्रम ... की तू काही मेलेला नाहीस.

[भैरू पळत जातो.]

विक्रम : अरे, हा कुठं गेला ?

माला : आपण परत आलो, हे गावभर सांगायला पळाला असेल.

हवालदार : [किसनला] चल, आता. झालं ना भेटूनं विक्रमला ? चल आता कोठडीत परत.

विक्रम : हवालदार त्याला उगाच डांबलाय् कोठडीत. तो खुनी नाही.

हवालदार : काय म्हणालास? तो खुनी नाही.

विक्रम : नाही....नाही ...नाही. मी हे फौजदारांना सांगायलासुध्दा भीत नाही.

हवालदार : थांब. मी घेउनच येतो फौजदाराला. पण जाऊ कसा ? हा पळून गेला, तर.

भटजी : आणा ती दोरी इकडे. मी धरून ठेवतों. अजिबात हलूं देत नाहीं शिंच्याला. लुच्या कुठला... भामटा.... [दोरी धरतो.]

विक्रम : तो नाही पळून जाणार. प्रामाणिक आहे तो. तुम्ही जा हवालदार. [हवालदार जातो.]

भटजी : प्रामाणिक? अरे, तो खोटारडा, बदमाश, दारूड्या अट्टल खुनी आहे.

विक्रम : भटजीबुवा, खोटारडे तुम्ही आहात. देवाचं नाव घेऊन लोकांना फसवता. मघाशी तुमच्या डोळ्यांसमोर आमचे आत्मे आले होते नाही का? जिवंत मुलांचे आत्मे आणि त्या थोतांडात तुम्हांला बिच्याऱ्या किसनची अडचण होत होती. पण तुमचं आम्हांला स्वर्गात पाठवणं जसं खोटं, तसा या किसनवरचा खुनाचाआळ देखील खोटाच.

रमण : भटजीबुवा, मघा अंत्यसंस्कारासाठी दक्षिणा घेतलीत, ती परत करा, बघू.

भटजी : परत? अरे, दक्षिणा कोणी परत मागते? दिलें दान, घेतलें दान, पुढल्या जन्मीं लंबे कान!

मावशी : हे, हो, काय, भटजी? एक तर ही मुलं जिवंत असताना तुम्ही त्यांना स्वर्गात पोचवायला निघाला होता. आणि वर आणखी दक्षिणा लाटता?

भटजी : अहो, कोण लाटतेय् दक्षिणा? पोरें परत आली, म्हणून सत्यनारायण घाला....तुम्ही एक! आणि, सुशिलाबाई, तुम्ही एक! या दक्षिणा म्हणजे त्या सत्यनारायणाच्या पूजेचा ॲडव्हान्स समजू....दुसरं काय? ही; ही; ही; .... [हसत जातो.]

मावशी : [विक्रमला] आणि, चांडाळा....तू कुठं होतास इतके दिवस!

विक्रम : ते आमचं सीक्रेट आहे.

मावशी : शिक्रेट कसलं? माझ्या जिवाला केवढा घोर लागला होता! मेल्या, मला सुखानं जगू दयायचंच नाही, असं ठरवलंयूस, की काय, तू? .... नेहमी मला रडवत आलास!

विक्रम : हां ... पण, मावशी, तेव्हा तुला माझे गुण कळले नव्हते खरं की नाही?

माला : आणि, आई ..माझ्यासारखी मुलगी सबंध जगात सापडायची नाही, होय की नाही?

मावशी : मेल्यांनो ... चोरून ऐकत होता, की काय, आमचं बोलणं?

रमण : तरी तुला सांगत होतो, की यानंच नाक शिंकरलं!

विक्रम : गोल्डन गँगचे लोक नेहमीच लपून छपून वावरतात, आणि गरज पडेल, तेव्हा एकदम प्रकट होतात!

मावशी : कसली गँग म्हणालास?

विक्रम : गोल्डन! धि ग्रेट! गोल्डन गँग!

मावशी : म्हंणजे काय? सर्कशीत का गेला होतास? [ भैरू काळूरामला घेऊन येतो. ]

भैरू : [ काळूरामला ] ही बघा तिन्ही पोरं? आहेत ना जित्ती?

माला : [ घाबरून ] काळूराम!

विक्रम : सुडक्या, माला, जीव वाचवायचा असेल, तर लौकर पळा! वन - टू - थ्री! [ तिघंही पळत सुटतात. ]

मावशी : अगोबाई, ही पोरं परत कुठं गेली?

रमण : ती नक्की स्मशानात ...

मावशी : मेल्या, तुझ्या जिभेला नाही हाड....

काळूराम : काय म्हणालास? स्मशानात? स्मशानात काय? पुढं बोल ना ....

रमण : मी नाही बोलणार! स्मशानातलं भूत माझ्या मानगुटीवर बसेल.

काळूराम : पुन्हा स्मशानात? बोल ... तुला नक्की काय माहीतेय्?

सुशीला : अहो, पण आमची मुलं कुठं गेली, हो?

[ फौजदार तिन्ही मुलांना घेऊन परत येतो. बरोबर हवालदार. ]

फौजदार : पळून चालली होती. पण म्हटलं, माहीती दिल्याशिवाय पळून कुठं जाता?

माला : आम्ही कसली माहीती देणार? आम्हांला हा काळूराम ठार मारून टाकील.

फौजदार : काही नाही करणार. मी आहे ना.

विक्रम : तुम्ही आता सांभाळाल! पण काळूराम आम्हाला कुठंही गाठेल आणि मारून टाकेल. अहो, ज्यानं डॉक्टरांचा खून केला, त्याला आमचा खून करणं काय कठीण आहे?

फौजदार : कुणी डॉक्टरांचा खून केला? काळूरामनं?

किसन : नाही, नाही. डॉक्टरांचा खून मी केला.

विक्रम : खोटं आहे! काळूरामनंच हे तुझ्या डोक्यात भरवलंय्. आधी त्यानं तुझ्या डोक्यात कुदळीचा दांडा घातला, मग तुझ्या डोक्यात हे खोटंनाटं घातलं. पण आम्ही सिध्द करून देऊ, की खरा खूनी तोच आहे.

[ काळूराम पळत सुटतो. ]

फौजदार : काळूराम, काळूराम पळाला! त्याला पकडलाच पाहिजे!

[असं ओरडत फौजदार आणि हवालदार त्याच्या मागे धावत जातात.]

——पडदा——

## अंक ३ रा

### प्रवेश १ ला

[गावाबाहेरचं भुताटकीचं घर. घराची बैठकीची खोली. दारावर थाप ऐकू येते. सुडक्या हातातली भाकरी न् थाळी एका कोपऱ्यात ठेवून दाराशी जातो.]

सुडक्या : कोन हाय ?

विक्रम : [बाहेरून] मी ..... समशेरजंग उर्फ दिलेर डाकू नंबर वन् वन् वन्.

सुडक्या : परवलीचा शब्द ?

विक्रम : रक्त !

सुडक्या : फत्ते ?

विक्रम : फत्ते !

[सुडक्या दार उघडायला जातो. पण विक्रम ते बाहेरून नुसतं ढकलतो. त्याला आतून कडी नसतेच.]

सुडक्या : कसं हाय माजं घर ?

विक्रम : छान आहे ! ....आता वाऱ्यापावसाची भीती नाही तुला !

सुडक्या : खरं हाय ! वाऱ्यापावसाची नाय, पन थोडी भुताटकीची भीती हाय !

विक्रम : दिसलं तुला एखादं भूत ?

सुडक्या : दिसलं नाय ... मी मघाच आलो न्हवं ! भूत कधी दिवसा दिसतं ! .... आता रातची येत्याल समदी मंडळी !

विक्रम : खरंच येतील ?

सुडक्या : मग ? भुताटकीचं घर हाय न्हवं हे ? जास्त न्हाई तर एखादुसरं भूत तरी असायचंच हितं !

[पुन्हा दार वाजतं.]

विक्रम : अरे, बापरे, ! भूत म्हटल्याबरोबर खरंच आलं, की काय ?

सुडक्या : कोन हाय ?

माला : [बाहेरून] लगाव बत्ती परवीन बाबी, नंबर सेव्हन् सेव्हन सेव्हन !

सुडक्या : परवलीचा शब्द ?

माला : रक्त !

सुडक्या : फत्ते ?

माला : फत्ते !

विक्रम : मग ये आत. दार उघडंच आहे !

[माला येते.]

माला : इ........ काय भयंकर जागा आहे. मला इतकी भिती वाटतेय !

विक्रम : कसली भिती ?

माला : भीती ना ? कसली अशी नाही. पण हे भुताटकीचं घर आहे. की नाही ? मग अगदीच भीती न वाटून कसं चालेल ?

विक्रम : बरं, मालनदेवी, गँगनं ज्या कामासाठी पाठवलं होतं, त्याच काय झालं ? सगळी बातमी काढलीय, सरदार. त्या दिवशी पळून गेलेला काळूराम अजूनही कुणाला दिसला नाही. फौजदार त्याच्या मागावर आहेत. बातमी खतम !

विक्रम : आपण संभाळून राहिलं पाहिजे. आपली गँग काळूरामची शत्रू नंबर वन आहे. कारण आपण त्याचं पाप उघडकीला आणलंय. तेव्हा तो कसाही कुठूनही येऊन आपल्यावर झडप घालील.

माला : म्हणूनच सरदार आपल्या दोघांच्याही घरी येणाऱ्या माणसांवर आम्ही बारीक नजर ठेवलीय.

विक्रम : कोण कोण येऊन गेलं ?

माला : भाजीवाली सई···पिचके मास्तर···· भोळू गवळी ···· भैरू आणि दाढीवाला मुका !

विक्रम : भैरूच्या बरोबर तो दाढीवाला मुका अलीकडे नेहमी असतो, नाही ?

माला : खरंच, तो तर काळूराम नसेल? दाढी लावून आणि काळा चष्मा लावून फिरणारा?

विक्रम : हॅट! तो कसा असेल? तो तर मुका आहे. वर बहिरा सुद्धा

सुडक्या : [खिडकीतून पाहून] इक्रम तो मुका भैरा चाललाय.

विक्रम : सरदार विक्रमसिंग म्हण, म्हणून कितीदा सांगितलं.

सुडक्या : त्ये ...व्हाहूद्या. त्यो मुका भैरा हितंच येतुया. अरं बापरं!

विक्रम : लप लप, माला. सापडेल तिकडे लप. त्या माणसांनी आपल्याला पाहून मुळीच चालायचं नाही. चला वरती माळ्यावर लपू या. [तिघही धावपळ करून माळयावर चढून बसतात. घोंगडी पांघरलेला दाढीवाला येतो. इकडे तिकडे पाहातो मग कुदळीन जमीन उकरु लागतो.]

माला : जमीन कशाला उरकतोय तो?

विक्रम : मला काय ठावूक? काय दिसतं, ते बघत राहा.
[दाढीवाल्याला कुजबूज अैकल्यासारखं वाटतं. तो इकडे तिकडे पहातो. कोणीच दिसत नाही. त्याला माळ्यावर कुणी आहे, असा संशय येतो. तो माळ्याच्या पायऱ्या चढू लागतो. पोरांची घाबरगुंडी. इतक्यात दारावर थाप बसते दाढीवाला परत खाली जातो.]

दाढी : कोण आहे?

विक्रम : अरे, हा तर बोलतोय्?

सुडक्या : म्हंजी! त्यो मुका न्हाई.

भैरू : [बाहेरून] मी हाय भैरू

दाढीवाला : आत ये. दार उघडच आहे.
[भैरू आत येतो. त्याच्या बरोबर रमण.]

विक्रम : [चकीत] रमण ...... ?

रमण : भैरू–मला इथं कुठं आणलसं? मळयातल्या कैऱ्या पाडायला ना नेत होतास?

दाढी : चूप! - अधिक गडबड केलीस, तर बघ! मी कोण आहे माहीतेय् ना तुला? ........ काळूराम.


माला : बघा....मी सांगत नव्हते....तो मुका काळूरामच आहे!

रमण : काळूराम? [ रडू लागतो. ]

काळूराम : चूप रडशील, तर खबरदार! हा खड्डा मी कशासाठी खणतोय् ते माहीतेय्?

रमण : [ रडत ] नाही....

काळूराम : तुझ्या त्या भावाला आणि त्या पोरटीला न् त्या भिकारड्या पोराला पुरून टाकणारेय् मी! [ माळयांवर घबराट. ] बोल! कुठं आहेत ती तिघं?



रमण : मला—मला देवाशप्पथ माहीत नाही ? ती मला कसलाच बेत सांगत नाहीत - मी मावशीला सांगेन म्हणून !

काळूराम : भैरू - हा खड्डा आणखी खोल कर ! [ भैरू खड्डा खणू लागतो. ] त्या पोरांनी माझं नाव फौजदाराला सांगितलं पन मी त्यांना पुरून उरतोच, की नाही, बघ ! इथंच पुरणार आहे. मी त्यांना !

रमण : पण मला सोडा, हो ..

काळूराम : गेले चार दिवस मी आणि भैरू... त्यांच्या पाळतीवर आहोत! पण हाती लागतच नाहीत डांबरट कार्टी ! तू त्यांना इथं घेऊन ये....नाहीतर तुला सुध्दा पुरून टाकतो, की नाही, बघ !

रमण : त्या तिघांची एक गँग आहे आणि ते, म्हणे, डाकू आहेत ! म्हणून हल्ली घरात नसतातच ती !

काळूराम : मग कुठं असतात ?

रमण : कसली गुपितं थोडीच डाकूमंडळी आपल्याला सांगणार ?

काळूराम : मग ते स्मशानांच बरं तुला ठाऊक होतं ?

रमण : तेवढंच ठाऊक होतं पण आता त्यांची गँग कुठं असते, काय करते, यांतलं काही म्हंजे काही सुध्दा मला माहीत नाही !

काळूराम : खोटं बोलतोस....भैरू ! खड्डा खणून झाला, की या पोराला पण टाकूया त्यातच ! [ रमण मोठमोठ्यानं रडू लागतो. ]

[ माळयावर ...... ]

माला : आता काय करायचं ? रमणला तर वाचवायलाच हवं !

विक्रम : थांब....एकदम घाई केली, तर सगळेच धोक्यात येऊ !

काळूराम : भैरू मघापासून मला या घरात कोणीतरी कुजबुजल्या-सारखा आवाज येतोय !

भैरू : लक्ष देऊ नका तिकडे ! हे भुताटकीचं घर हाय ना ? मग ? ....ती भुतं असला चावटपणा करायचीच ! आपण तिकडे बघायचं नाही !

काळूराम : बापरे, म्हंजे खरंच इकडे भुतं असतील?

भैरू : जास्त नसतीलं....उगाच पाचधा भुतं कुठं भिंतीना चिकटून असतील तेवढीच ! तीबी जातील तुम्हांला भिउन! तुम्ही डाके घालणार !....खून करणार....पोरांना पुरून टाकणार भुत काय तुम्हाला घाबरल्याशिवाय ऱ्हातील ?

भैरू : काळूदादा, थांबा. हे बघा काय, या खड्डयात कायतरी दिसतंय्.

काळूराम : [ धावत भैरूकडे जाऊन ] हे काय? काढ लौकर बाहेर [ भैरू भराभर खणू लागतो. शेवटी एक पेटी बाहेर येते. ] पेटी? खजिन्याची, की काय?

भैरू : तर हो. खजिन्याची नायतर आणखी कसली? [ काळूराम पेटी उघडतो. ]

काळूराम : खरंच, रे, खरंच यात खजिना आहे मोहराच मोहरा कोणाच्या, रे, असतील?

भैरू : कोणाच्या म्हंजे? आता आपल्याच की.

काळूराम : खूप जुन्या दिसताहेत मोहरा. पण सोन्याच्या आहेत. वितळवल्या, की रग्गड पैसा. आपल्या सारख्याच कुणा चोरलुटारूनी त्या ठेवल्या असणार.



भैरू : ते तर झालंय. नायतर काय गुरूजी खजिना ठेवणार का भटजी ?

काळूराम : काय मज्जा आहे ! आता कधीच डाके घातले नाहीतरी चालेतील आता आपण श्रीमंत झालो. श्रीमंत झालो.

[दोघेही आनंदानं नाचतात.]

रमण : मी हात लावून बघू का त्या मोहरांना ? मी कधीच मोहरा पाहिल्या नाहीत.

काळूराम : चूप. तुला काय करायच्यात आता मोहरा ? आता तर तू मरून जाणार. भैरू खड्डा पुरेसा मोठा झाला असेल ढकल त्याला आता. [ते त्याला खड्यात ढकलतात.] हं आता टाक माती.

भैरू : ते सावकाश करता येईल. आता तो कुठं जात नाही. आधी आपण गावात जाऊन थोडी दारू पिऊ.

काळूराम : खरंच एवढा मोठ्ठा खजिना मिळाला. त्याचा आनंद करायला हवाच दारू पिऊन.

भैरू : चला तर.

काळूराम : पण थांब. हे कारटं खड्डयातनं बाहेर येईल. याचे हातपाय बांधून ठेवायला हवेत.

भैरू : चला, चला .... बांधून टाकू.

[आरडाओरडा करणाऱ्या रमणचे हातपाय ते दोघे बांधून ठेवतात.] हां. .... आता बोंबल किती पण ! हितं कोण तुला सोडवायला येणार नाय !

काळूराम : पण मघाशी आपण इथं कोण हाय, ते शोधत होतो....त्याचा पत्ता नको आधी लावायला ?

भैरू : त्याची व्यवस्था होतेय् बघा आपोआप ! मीच करतो ती···· तुम्ही आधी चला····

[दोघे जातात.]

रमण : परमेश्वरा, मला सोडव !

विक्रम : [माळ्यावरून आवाज बदलून] हां .... घाबरू नकोस ! मी आलोच !

रमण : कोण बोलतंय् ?

विक्रम : मी .... परमेश्वर !

[सुडक्या आणि माला हसू दाबतात.]

रमण : परमेश्वरा ...लौकर या ! मला सोडवा !

विक्रम : अेका अटीवर सोडवीन ! ...

रमण : सगळ्या अटी कबूल ! ... पण आधी मला सोडवा ! ते काळभैरव कधीही परत येतील !

विक्रम : मग विक्रमला त्रास देणार नाहीस ?

रमण : परमेश्वरा, मी कुठला त्याला त्रास देणार ! तोच उलट मला.... पण ठीक आहे ! तुम्ही म्हणत असाल, तर मी नाही देणार त्याला त्रास !

विक्रम : त्याचं सगळं सांगणं ऐकशील ?

रमण : हो .... एकूण एक !

विक्रम : मावशीकडे त्याच्या चहाड्या करणार नाहीस ?

विक्रम : कधीच नाही....पण लौकर या !

[विक्रम माळ्यावरून उतरून येतो. त्याच्यापाठोपाठ इतर दोघेही.] विक्रम, तू इथं ?

विक्रम : मग....तुला काय वाटलं ? खराखुरा परमेश्वर येणारेय् इथं तुझ्यासारख्या पाप्याच्या पितरासाठी ?

रमण : कितीही शिव्या दे....पण आधी मला सोडव इथनं !

[ते तिघे त्याला सोडवतात.]

माला : काय भयंकर आहे तो काळूराम ! सरळ आपलं मुलांना पुरून टाकायचं म्हंजे काय ?

विक्रम : [खजिन्याची पेटी उघडून] माला, हा खजिना बघ! काळूरामासारख्या दुष्ट माणसाला तो अजिबात मिळता कामा नये!

माला : आपण तो घेऊन जाऊ या....आणि गोरगरिबांना वाटून टाकू या!

सुडक्या : हां....आता येळ न्हाई खजिन्याचं कवतिक करीत बसाया! राकसस कवा परत यील, सांगता न्हाई येणार! आधी इथनं भाईर पडू या!

माला : खरंच! इथनं बाहेर पडलं, तर फौजदारांना वर्दी देता येईल खजिन्याची!

[चौघेही धावत दाराशी जातात. दार उघडू लागतात. पण]

विक्रम : दार बंद आहे! त्या दुष्ट माणसांनी बाहेरुन कुलूप लावलंय दाराला!

माला : बाई, ग....! आता काय करायचं? त्यांनी आपल्याला इथं पाहिलं, तर खलास आपण! [विक्रम व सुडक्या दारं, खिडक्या, किती मजबूत आहेत ते पाहतात.]

विक्रम : काही उपयोग नाही! सगळा पक्का बंदोबस्त आहे! म्हंजे इथंच मरुन जाणार! त्या काळूरामाला जरासुद्धा दया नाही! तो आपल्याला जिवंत सोडणंच शक्य नाही! रमणला पाहिलस ना, तो कसली भयंकर शिक्षा देत होता, ते....?

सुडक्या : असं घाबरून नका जाऊ. अजून लई वेळ हाय. ह्ये घर गावाबाहेर हाये. हितनं ते गावात जानार .... थितं दारु पीत बसनार....म्हंजी अजून एक दोन घंटं तरी येत न्हाईत ते

माला : पण एक तास असला नि दोन तास तरी या बंद घरातून; आपण कसे सुटू?

विक्रम : विचार करुया. सुचेल काहीतरी. काहीही करून ते येण्याच्या आत आपण इथनं पळालंच पाहिजे. पण कसं? कसं?

(काळोख)

## प्रवेश २ रा

[त्याच ठिकाणी तासाभरानंतर विक्रम, काळूरामच्या कुदळीनं भिंत फोडत आहे.]

माला : लौकर, विक्रम....ते दोघे कधीचे गेलेत ! केव्हाही परत येतील !

सुडक्या : तू दमला असशील, इक्रम .. आता थोडावेळ मी फोडतो ] आण इकडं ती कुदळ ! [ थोडावेळ तो फोडतो. ]

विक्रम : शाब्बास ! चार विटा तर फुटल्या. [ माला एकदम किंचाळते ] काय झालं, माला ?

माला : कुलूप ऊघडतंय....ते आले !

सुडक्या : पळा....पळा ! जितक्यांना या फुटलेल्या जागेतनं जाता येईल तितक्यांनी जा !

विक्रम : सगळे एकदम नाही जाऊ शकणार ! एकेकानं जा....माला, तू आधी जा !

माला : मी तुझ्याबरोबर जाणार ! मी नाही आधी जाणार ! रमण जाईल.

रमण : हो....हो....मी जातो.

विक्रम : दुसरा नंबर सुडक्या !

[ रमण जातो. सुडक्या जाऊ लागतो. ] माला... लप ! ते आले. [विक्रम आणि माला लपतात. दार उघडून काळूराम आणि भैरू आत येतात. दोघेही दारू पिऊन तर्रर झालेले. ]

काळूराम : भैरू.. ते पोर बघ काय करतंय् ! आँ....हा भोकसा कसा पडला ? [ बाहेर पडण्यच्या धडपडीत असलेल्या सुडक्याला भैरू मागं खेचतो. ]

भैरू : काळूदादा...तरी मी सांगत होतो, की आजचा माल चांगला नव्हता ! एकदम डोक्यात गेला ! हे पोर...मघांशी किती वेगळं दिसत होतं अन् आता किती वेगळं दिसतंय् !

काळूराम : अरे, खरंच की! माला सुध्दा जाम चढलीय, रे! पोर एकदम वेगळंच दिसतंय!

भैरू : काळूदादा, असं तर नसंल?

काळूराम : कसं?

भैरू : हे पोरगं वेगळंच असेल.

काळूराम : असेल काय, गड्या....आहेच हे पोर वेगळं! अरे, हा तर दुसरा पोरगा आहे...तो विनआईबापाचा! म्हंजे मघा आपल्याला ती घाणेरडी फडकी न थाळी न डबडं सापडलं, ते याचंच.

भैरू : पण मग ते दुसरं पोर....ते कुठ गेलं? [सुडक्याला] काय रे? तो पोरगा कुठं गेला?

सुडक्या : कंचा पोरगा म्हंता?

काळूराम : सोंग करू नकोस. जीव घेईन खरं बोल नाहीतर! विक्रमचा भाऊ तो...काय त्याचं नाव...चमन....[सुडक्या : हां.... चमन] चमन नाही, रे....आपलं खमण [सुडक्या : हां.... खमण!] खमण नाही .. रमण....[सुडक्या : हां, रमण!] तोच! कुठं आहे तो?

सुडक्या : मला काय माहित!

काळूराम : तुला माहीत नाही काय? भैरू....उचल याला! [भैरू सुडक्याला कानाला धरून उचलतो.]

सुडक्या : ओय्....ओय्....ओय्....माझा कान! सांगतो....सांगतो. पण मला मारू नका!

काळूराम : बोल कुठाय तो?

सुडक्या : [माळ्यावर बोट दाखवून] वर!

भैरू : चल....दाखव कुठाय तो! चोरा, तुला काय वाटलं, तू सुटशील?

काळूराम : भैरू! काय गाढव आहोत आपण! त्याला विचारतोय पोरगा कुठाय? अरे, हा पोरगा उतरत होता ना त्या

भोकशातून ? म्हंजे तो दुसरा तसाच उतरून गेला असणार ....आणि गेला म्हणजे तडक घरीच जाणार तो ! पळ... पळ ... गाठ त्याला !

भैरू : पण हा कार्टा ?

काळूराम : मरू दे त्याला ! तू आधी त्याला पकड ! अरे, तो गावात कुठं बोलला, तर अख्खा गाव लागेल आपल्या मागं !

[भैरू घाईघाईनं जातो.]

काळूराम : [सुडक्याला] आता बोल....कुठाय विक्रम ?

सुडक्या : मला काय म्हाईत ?

काळूराम : अस्सं ! म्हाईत नाही म्हणतोस ! तुम्ही मला स्मशानात पाहिलंत, त्या दिवसापासून मी काय शपथ घेतलीय ठाऊकेय तुला ?

सुडक्या : पुन्हा मसणात जायचं नाही .... अशी ?

काळूराम : अशी नाही ! तुम्हा तिघांची चटणी केल्याशिवाय राहायचं नाही, अशी.

सुडक्या : आमची तिघांची चटणी लई तिखट होईल, काळूदादा. तोंड भाजेल !

काळूराम : मला उलटून बोलतोस ? [ त्याच्या एक कानफटात मारतो. तो खाली पडतो. ] बोल, कुठाय विक्रम ? [ त्याला मारू लागतो. ] सांग सांगतोस, की नाही ?

सुडक्या : नाही, नाही, नाही....

[ कशीबशी काळूरामच्या हातून सुटका करुन घेऊन पळू लागतो. काळूराम त्याच्या मागे धावतो. विक्रम जागेवरुन एक अडगळीतलं स्टूल मधेच टाकतो. तो त्याला अडखळतो. पुन्हा उठून धावतो. विक्रम दोरखंड टाकतो. त्याला अडून पडतो. तोवर सुडक्या दाराशी पोचलेला. तरीही काळूराम शर्थीन त्याला पकडतो.

[ त्या बरोबर विक्रम आणि माला लपल्या जागेवरून बाहेर येतात. ]

विक्रम : सोड....सोड त्याला!

काळूराम : विक्रम....इथंच आहेस होय तू? आणि तू सुध्दा नकटे?.... शाब्बास! आयतीच मिळालात तिघंही अेकत्र!

[ जंगी मारामारी होते. त्यात पोरं जिंकतात. पण काळूराम अचानकपणे खिशातून पिस्तूल काढतो. त्यामुळे त्यांचा नाईलाज होतो. ]

हे काय पाहिलंत? .... लहान मुलांनी खेळण्याचं हत्यार नाही हे....हे आहे पिस्तूल! दिवाळीतलं, फटाक्याचं नाही खरंखुरं मी रागावलो आणि याचा चाप ओढला, तर....तर काय होईल माहीतंय्? तुमच्या तिघांचेही प्राण....एका क्षणात जातील! नुसतं 'आई गऽ' मधलं 'आऽ' सुध्दा करायला तुम्हांला वेळ मिळणार नाही! ... फक्त मी रागावलो, तर!

विक्रम : असं असेल....तर मग रागावताच कशाला?

काळूराम : मी रागावलो आहे!....भयंकर रागावलो आहे! एकतर त्या खुनाच्या वेळेस कारण नसताना तुम्ही स्मशानात अड-मडायला आलात! दुसरं म्हंजे तुम्ही सरळ चारचौघात मला दोषी ठरवलंत! ऊजळ माथ्यानं फिरणाऱ्या माझ्या सारख्या माणसाला तोंड लपवून या भुताटकीच्या घरात राहायला लावलंत! त्याची शिक्षा म्हणून आता तुम्हांला माझ्या हातून मेलंच पाहिजे! घ्या देवाचं नाव....एक.... दोन....

[ पण 'तीन' म्हणायच्या आतच दार उघडतं, आणि किसन धावत येऊन त्याच्या कमरेत लाथ घालतो. त्याच्या हाता-तलं पिस्तूल दूर फेकलं जातं....किसन आणि काळूराम यांची

झटापट होते, मुलं अर्थातच किसनला मदत करतात. शेवटी किसन पिस्तूल मिळवतो. काळूराम खाली पडलेला. ]

किसन : तुला काय वाटलं काळूराम, माझ्यावर खोटा आळ घेऊन तू सुटशील? त्या वेळेस मी दारूच्या नशेत होतो...पण दारूपायी माझ्यावर तो भयंकर प्रसंग ओढावला तेव्हा-पासून मी दारू पार सोडली .. आता मी पूर्वीसारखा लुळापांगला राहिलो नाही, काळूराम ! ... आता मी पार बदललोय् !

काळूराम : तू.... तुला लॉकअपमधनं सोडला ?

किसन : आजच ! .... पण मी वचन दिलंय् फौजदाराला ?

काळूराम : कसलं वचन ?

किसन : त्यांना मदत करण्याचं ?

काळूराम : मदत? तू, रे, कसली मदत करणार ?

किसन : तुझा शोध लावून देणार ! मला कल्पना नव्हती, की लॉक-अपमधून बाहेर पडल्या पडल्या लगेच मला तुझा पत्ता लागेल ! नशिबानं मला रस्त्यातच रमण भेटला ... आणि त्यानं

काळूराम : रमण? ते कार्टं इथनं पळालं आणि तुला भेटलं ....

विक्रम : किसन? आता काय करणार आहेस तू? मारणार काळूरामला ?

किसन : नाही, विक्रम ! ते काम फौजदाराचं आहे ! आपण फक्त त्याला स्वाधीन करायचं फौजदाराच्या ! चलो, काळूराम चलो ! [ एकदम भैरू मागून येऊन किसनच्या हातावर झटका मारून त्याचं पिस्तूल उडवितो. काळूराम ते मिळवितो]

काळूराम : काय, किसन, मोठी हुशारी वाटत होती ना ? आता मला फौजदाराकडे जाण्याऐवजी तुलाच स्मशानात जावं लागणारेय् चल ! मला कल्पना नव्हती, लॉकअपमधून सुटल्यावर तुला लागलीच मरावं लागेलं, याची ? देवाची

प्रार्थना करायला तुला फक्त एक मिनिट देतोय् ! भैरू, पोरगं कुठाय् ?

भैरू : मी त्याच्या मागं जीव घेऊन पळालो, काळूदादा....पण ते घरी पोचलेलं दिसलं....मग मला मागं फिरावंच लागलं !

काळूराम : काही हरकत नाही. वेळेवर आलात ! चला सगळे रांगेत उभे रहा.

माला : आम्हाला सगळ्यांना तू एकदम मारणार ? दुष्ट !...तुला शिक्षा झाल्याशिवाय राहाणार नाही !

काळूराम : हा....हा....हा ! पोरी, मी एक खून केलेलाच आहे. आणखी चार केले तरी मी फाशी फक्त एकदाच जाणार....हं....आता नीट उभी राहा पाहू रांगेत. एक...दोन....

['एकाएकी दारातून मावशी आणि सुशिलाबाई मोठमोठ्यानं रडत ओरडत येतात .... ]

मावशी : विक्रम, कुठे आहेस माझ्या बाळा ?

सुशीला : माला....अग पोरी....असं कसं झालं, ग....

[दोघीही धावत येऊन विक्रम व मालाला मिठ्या मारतात काळूराम पिस्तूल झाडतो, पण त्याचा नेम चुकतो. आवाज ऐकून मावशी व सुशीला पळत सुटतात. खूपच गोंधळ होतो. या गोंधळाचा फायदा घेऊन किसन व सुडक्या काळूरामवर चढाई करण्याचा प्रयत्न करतात. भैरू त्यांना अडवतो. शेवटी एकदाची थोडीफार शांतता होते.]

काळूराम : काय कटकट आहे ! या बायका कुठून आल्या ?....मावशी धावू नका उगीच ! ....उभ्या रहा सरळ !

मावशी : म्हंजे ? मेल्या तू मलासुद्धा मारणार, की काय ?
[धबाधबा त्याच्या पाठीत मारते.]

काळूराम : मावशीबाई, माझ्या हातात काय आहे, पाहिलंत का ? खरंखुरं पिस्तूल !

[मावशी व सुशीला किंचाळतात.]

मावशी : मेले, मेले!

काळूराम : अजून मेली नाहीस, पण लौकरच मरशील! हं... आता कुणी तोंडातून शद्ब काढलात, तर बघा! [नेम धरतो.] एक... दोन....[दार खाडकन उघडतं, आणि रमण फौजदारांना घेऊन येतो. त्याच्याबरोबर हवालदार]

फौजदार : [बंदूक रोखून] हां, काळूराम, पिस्तुल खाली टाक!

मावशी : [रमणला जवळ घेऊन] आलं, ग, माझं बाळ, मी सांगितल्यासारख फौजदारांना घेऊन!

फौजदार : काळूराम, तुझी वेळ भरली... फार केल्यात गमजा, आता जा फाशीवर जा! भैरु या हरामखोराचा साथीदार म्हणून तुलाही तुरुंगात पडावं लागणारेय! हवालदार, नेऊन बसवा बाहेर जीपमधे, पोलीस बंदोबस्तात.

[हवालदार काळूरामला घेऊन जातो.]

भैरू : माफ करा, फौजदार एक वेळ माफ करा! चार पैसं मिळावं, म्हणून मी यां काळूरामची साथ करीत व्हतो! माफ करा!

फौजदार : माफ? या निरपराध मुलांच्या प्राणावर उठलेल्यांना माफ? [परत आलेल्या हवालदाराला] घेऊन चल याला

[हवालदार भैरूला घेऊन जातो,]

विक्रम : मावशी, तू कशाला येऊन जीव धोक्यात घातलास?

मावशी : चांडाळा, मलाच उलट विचारतोस? किती वेळा माझ्या जिवावर उठणारेस? एकसारखी काळजी करायला लावून मला म्हातारीला एकदा मारुन टाक म्हंजे सुटलास! त्या दिवशी बेटावर गेलास.... आज या भुताटकीच्या घरात! म्हंजे समजांयचं तरी काय मी?

विक्रम : तुला मी फार दुःख देतो मावशी....पण काय करणार? आमचं आयुष्यच असं आहे!

मावशी : तुमचं ? म्हणजे कोणाचं ?

जिवावर उदार होऊन शत्रुशी मुकाबला देणाऱ्या डाकूंच्या टोळीचं दि ग्रेट गोल्डन गँगचं !

मावशी : डाकूंची टोळी ? अरे, देवा....म्हजे तू आता, तू डाकू झालायस !

सुशीला : बाई ... ! हा मुलगा इतका वाया गेला असेलसं वाटलं नव्हतं आहेत तरी कोणकोण उनाड पोरं तुझ्या टोळीत ?

विक्रम : सुडक्या....आणि तुमची मालासुद्धा ?

सुशीला : [ किंचाळून ] काय ? मालासुद्धा ?

किसन : आणि, विक्रम फौजदारांसमोर हे सांगतोस ? डाकूंना पकडतात ना ते ?

फौजदार : [ हसून ] काही हरकत नाही, किसन. आजपासून तूही त्यांच्या टोळीत सामील हो ! ही टोळी डाकूची असेल, पण हे डाकू सोनेरी डाकू आहेत ! वागायला चांगले आहेत ! विक्रम, तुझ्या गोल्डन गँगनंच तर खरा खुनी उघडकीला आणला ! आम्हाला तुझा अभिमान वाटतो.

विक्रम : फौजदार ! आमच्या गँगनं नुसता खुनीच नाही...आणखीही एक गोष्ट उघडकीला आणली आहे. !

फौजदार : कुठली ?

विक्रम : हा खजिना ! [ खजिन्याची पेटी उघडून दाखवितो. ]

फौजदार : बाप, रे ! एवढा मोठ्ठा खजिना ?

मावशी : मेल्या, हे आणखी काय लचांड ?

फौजदार : हा कुठून आणलं त तुम्ही ?

विक्रम : हा इथंच सापडला ! पूर्वी कुठल्यातरी लुटारूंनी लपवलेला. काळूराम घेऊन जाणार होता तो ! ..... पण आम्ही हा तुमच्या स्वाधीन करायचं ठरवलं होतं ? म्हंजे सगळ्या गावालाच त्याचा फायदा होईल.

फौजदार : काय मावशीबाई ?

मावशी : वाटटेल ते करा त्या खजिन्याचं. माझा खजिना, म्हंजे ही मुलं !

फौजदार : मावशीबाई यातले थोडे पैसे वापरून आम्ही सुकड्याला नक्की मदत करू.

मावशी : काय म्हणून ? तो अनाथ थोडाच आहे? आजपसानं तो माझ्याच इथं राहील ! माझ्या विक्रम .... रमणबरोबरच शिकून मोठा होईल.

सुकड्या : म्हंजे शाळा ? रोज आंघोळ ? चांगले कपड ? नगा नगा मी हाय तोच बरा हाय !

[पळत सुटतो....पण विक्रम आणि माला त्याला अडवतात आणि सरळ मावशीकडे आणून देतात... ]

हळू हळू पडदा खाली येतो.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. 20८८८ [illegible]
वि. बाल नाट्य क्र. ..................

IRBK-0120799